Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL. UNLEASHING BRILLIANCE.
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon, Ahilyanagar 414006
नर्सरी ते दहावी पर्यंत दर्जेदार शिक्षण प्रणाली
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल
अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा


अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे
साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २७.०५.२०२५ | अंक नं. ४८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

फक्त फायदाच फायदा!
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# नगर शहरासह तालुक्यात ढगफुटी सदृश्य पावसाने हाहाकार

नगर - नगर शहरासह तालुक्यात २७ मे रोजी दुपारपासून ढगफुटी सदृश्य पाऊस कोसळत असून या पावसाने सर्वत्र हाहाकार उडाला आहे. तालुक्याच्या दक्षिण भागात असलेल्या पूर्वा व वालुंबा या नद्यांना इतिहासात प्रथमच एवढा मोठा महापूर आला असून नदीच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडत पाणी शेतात घुसले आहे. या पावसामुळे आणि आलेल्या पुरामुळे गावागावांचा संपर्क तुटला असून खडकी येथे जनावरे तर सारोळा कासार येथे वाहने वाहून गेली आहेत. जागोजागी रस्तेही वाहून गेले आहेत. दुपारी उशिरापर्यंत पाऊस थांबलेला नव्हता, त्यामुळे मोठी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

## पूर्वा, वालुंबा नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी, वाहने, जनावरे गेली वाहून

नगर तालुक्यातील कामरगाव, चास, भोरवाडी, सोनेवाडी, अकोळनेर, सारोळा कासार, अस्तगाव, खडकी, बाबुर्डी बेंद या परिसरात दुपारी १२.३० च्या दरम्यान मुसळधार पावसाला सुरुवात झाली. काही वेळातच पावसाने रौद्र रूप धारण केले. त्यामुळे कामरगाव परिसरात उगम पावणाऱ्या वालुंबा नदीला काही वेळातच महापूर आला. या पुरामुळे अकोळनेर ते भोरवाडी रस्ता वाहून गेल्याने दोन्ही गावांचा संपर्क तुटला. नदीवरील सारोळा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलावरून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाहत असल्याने अकोळनेर ते सारोळा वाहतूकही ठप्प झाली. अस्तगावकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या पूर्वा नदीलाही मोठ्या प्रमाणावर पूर आला. त्यामुळे अस्तगाव-सारोळा रस्त्यावरील वाहतूक बंद झाली. सारोळा ते घोसपुरी मार्गावरील पुलावरून पाणी वाहत असल्याने या दोन्ही गावांचाही संपर्क तुटला आहे. पूर्वा व वालुंबा या दोन्ही नद्यांचा संगम खडकी परिसरात होत असल्याने खडकी गावात पावसाचे पाणी घुसले. एक-दोन घरांना या पाण्याने वेढा दिला. खडकी येथील काही शेतकऱ्यांची जनावरे पुरात वाहून गेली. सारोळा कासार येथेही ट्रॅक्टर ट्रॉलीसह नदीच्या प्रवाहात वाहून गेला. परिसरातील सर्व गावांमधील गावतलाव, बंधारे ओसंडून वाहत असून ते फुटण्याचा धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी नदीच्या पाण्याने प्रवाह बदलून सदर पाणी शेतांमध्ये घुसल्याचे पाहावयास मिळाले. या महापुरामुळे वाळकी परिसरातील धोंडेवाडी येथील साठवण तलाव इतिहासात पहिल्यांदाच सायंकाळपर्यंत ओव्हरफ्लो होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. *(छायाचित्र पान ७ वर)*

परिमल मंदिर, बँगलोर वी सुवासिक सुपरवाह!
६ सुवासिक सुगंधासह
शुभलाभ
बेस्ट ६
झीपर पाऊच.
६ इन वन, १२० ग्रॅम
फक्त रु. 50 मध्ये
तसेच-डिओ, कापुर, शेंदूर, अत्तरे, धुप व अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
३ फुट पासुन पुढे अल्युमिनीयम लॅडर (शिडी) उपलब्ध

# नगर जिल्ह्यात या वर्षी मे महिन्यातच पावसाने आजपर्यंतचे सर्व रेकॉर्ड तोडले

## जिल्ह्यात २०१.२ मिमी पावसाची नोंद, नगर, पारनेर, श्रीगोंदा व कर्जत, जामखेडमध्ये अतिवृष्टी सुरूच

नगर - कडक उष्णतेचा महिना समजल्या जाणाऱ्या मे महिन्यात प्रथमच अवकाळी पावसाने द्विशतकी मजल मारली आहे. दरवर्षी मेमध्ये तुरळक पाऊस पडतो. सरासरीचा विचार करता चालू महिन्यात १८.५ मिमी पाऊस व्हायला हवा. परंतु गेल्या २७ वर्षांत मे मध्ये प्रथमच २०१.२ मिलिमिटर पाऊस झाला. तर गेल्या ३ -४ दिवसांपासून नगर, पारनेर, श्रीगोंदा व कर्जत, जामखेड या तालुक्यांमध्ये अतिवृष्टी होत आहे.

तज्ज्ञांच्या मते, साधारण २५ मे नंतर जिल्ह्यात मान्सूनपूर्व पावसाला सुरूवात होते. पण यंदा त्याआधीच अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावली आहे. मे महिन्यात आतापर्यंत १९९८ ते २०२५ दरम्यान एकूण चार वेळा ५० मिमीचा आकडा पावसाने ओलांडला होता. या वर्षी त्याच्या चौपट पाऊस झाला असून तो थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही.

दरवर्षीच्या तुलनेत यंदा केरळमध्ये मान्सून अगोदर म्हणजे २४ मे रोजीच दाखल झाला आहे. महाराष्ट्रात तो ५ किंवा ६ जूनला येईल, असा अंदाज वर्तवला जात होता. पण त्याआधीच तो महाराष्ट्रातही पोहचला आहे. त्या पूर्वीच अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. शहरासह जिल्ह्यात ५ मे पासून अवकाळी पाऊस सुरू आहे.





सीना नदीला सलग दुसऱ्या दिवशी पूर आल्याने नगर-कल्याण रोडवरील ठप्प झालेली वाहतूक, तर दुसऱ्या छायाचित्रात पर्यायी रस्ता असलेल्या वारुळाचा मारुती या रस्त्यावर नदीपात्रात वाढलेल्या जलपर्णी काढताना महापालिकेचे पथक. (छाया - लहू दळवी)

### जिल्ह्यात अनेक मंडळात ३०० मिमी पेक्षा जास्त पाऊस

जिल्ह्यात अनेक मंडळांत तर ३०० पेक्षा मिमी पावसाची नोंद झाली आहे. मे महिन्यात अवकाळी पावसाचा उच्चांक गाठला गेला आहे. १ मे महिन्या संपण्यासाठी आणि ५ दिवसांचा कालावधी असताना आता हा आकडा वाढण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

मे महिन्यात २७ मे रोजी सकाळी ८ वाजे पर्यंत मंडळनिहाय झालेला पाऊस पुढील प्रमाणे- नगर तालुका (एकूण २४१.७ मिमी) नालेगाव १३१.९ मि.मी., सावेडी २०९.७ मि.मी., कापूरवाडी १३९.५ मि.मी., केडगाव २२.९ मि.मी., भिंगार २६६.६ मि.मी., नागापूर २६७.१ मि.मी., जेऊर १७१.७ मि.मी., चिचोंडी पाटील २५४.३ मि.मी., वाळकी २८२.३ मि.मी., चास ३१२ मि.मी., रुईछत्तीशी ३१२.८ मि.मी., नेप्ती ३२७.९ मि.मी., पारनेर (एकूण २७८.१ मि.मी.), पारनेर ३३६. ९ मि.मी., भाळवणी ४४५.२ मि.मी., सुपा ३२५.३ मि.मी., वाडेगव्हाण २८९.६ मि.मी., वडझिरे २००.८ मि.मी., निघोज २९९.५ मि.मी., टाकळी २४८.१ मि.मी., पळशी १९४.५ मि.मी., कान्हूर पठार १६७.६ मि.मी., पळवे खुर्द २७६.४ मि.मी., श्रीगोंदा (एकूण ३३५.८ मि.मी.), श्रीगोंदा ३२४.४ मि.मी., काष्टी ३३१.८ मि.मी., मांडवगण ३२९.६ मि.मी., बेलवंडी ३६०.१ मि.मी., पेडगाव ४१५.२ मि.मी., चिंभळा ३०१.८ मि.मी., देवदैठण २६० मि.मी., कोळगाव ३९९.२ मि.मी., लोणी व्यंकनाथ २८८.८ मि.मी., भानगाव ३०४.१ मि.मी., आढळगाव ३६४.७ मि.मी., कर्जत (एकूण ३३४.२ मि.मी.), कर्जत ३८७.४ मि.मी., राशीन १९९.६ मि.मी., भांबोरा ४१९.६ मि.मी., कोंभळी ३७०.६ मि.मी., मिरजगाव २६५.४ मि.मी., माहिजळगाव ४०९.८ मि.मी., कुळधरण २२०.४ मि.मी., वालवड ३८७.४ मि.मी., खेड ४३२.२ मि.मी., कोरेगव्हाण २४९.९ मि.मी., जामखेड (एकूण २६१.४ मि.मी.), जामखेड २५६.३ मि.मी., अरणगाव ३२३.५ मि.मी., खर्डा ३४८.३ मि.मी., नान्नज २९०.९ मि.मी., नायगाव २९३.४ मि.मी., पाटोदा १४३.५ मि.मी., साकत १७३.७ मि.मी., शेवगाव तालुका (एकूण १४६.३ मि.मी.), पाथर्डी तालुका (एकूण २२२.५ मि.मी.), नेवासा तालुका (एकूण १२४.९ मि.मी.), राहुरी तालुका (एकूण १४६.९ मि.मी.), संगमनेर तालुका (एकूण १४६.२ मि.मी.), अकोले तालुका (एकूण १४१.२ मि.मी.), कोपरगाव तालुका (एकूण ६३.७ मि.मी.), श्रीरामपूर तालुका (एकूण ८८.७ मि.मी.), राहाता तालुका (एकूण १२२.४ मि.मी.) असा जिल्ह्यात मे महिन्यात २०१.२ मि.मी. एवढा विक्रमी पाऊस झाला आहे.

### सीना नदीला सलग दुसऱ्या दिवशी पूर; नगर-कल्याण रोडवरील वाहतूक पुन्हा ठप्प

गेल्या आठ दिवसापासून नगर शहर परिसरात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातलेला असून तीन दिवसापासून सुरु असलेला मुसळधार पावसामुळे मे महिन्यातच नगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीला २६ मे रोजी पहाटेच्या सुमारास मोठा पूर आल्याने नगर - कल्याण रोड वरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. त्यामुळे या परिसरातील नागरिकांचे हाल झाले. त्यात रात्री पुन्हा मुसळधार पाऊस झाल्याने नदीला २७ मे रोजी पुन्हा पूर येवून नगर कल्याण रोडवरील वाहतूक ठप्प झाली.

सीना नदीवरील नवीन पुलाचे काम गेल्या २ वर्षांपासून रखडत रखडत सुरु असल्याने या वर्षीच्या पावसाळ्या पूर्वीही हे काम पूर्ण न झाल्याने कल्याण रोड परिसरातील नागरिक तसेच या राष्ट्रीय महामार्गावरून ये जा करणाऱ्या वाहनचालकांचे मोठे हाल सुरु आहेत. मात्र याचे महापालिका प्रशासन, बांधकाम विभाग तसेच शहरातील लॉकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांना कोणालाच काही सोयर सुतक नसल्याचे दिसून येत आहे. महापालिकेची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तर या अवकाळी पावसानेच पूर्णपणे कोलमडून गेल्याचे दिसून येत आहे.

### महापालिका प्रशासनाने वराती मागून घोडे

गेल्या आठ दिवसापासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने अहिल्यानगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीला आज दुसऱ्या दिवशी पुन्हा पूर आला. त्यामुळे नगर कल्याण महामार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. पर्यायी मार्ग असलेल्या वारुळाचा मारुती या रस्त्यावर नदीपात्रात वाढलेल्या जलपर्णीमुळे या ठिकाणी देखील पुलावरून पाणी वाहत असल्याने स्थानिक माजी नगरसेवक शाम नळकांडे यांनी महापालिका प्रशासनाला व अधिकाऱ्यांना कळवून जलपर्णी काढण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर महापालिका प्रशासनाने दोन जेसीबीच्या साह्याने त्या जलपर्णी काढण्याचे काम सुरू केले. महापालिकेचे हे काम म्हणजे वराती मागून घोडे असे असल्याचा संताप नागरिक व्यक्त करत आहेत. हीच का महापालिकेची पावसाळ्यापूर्वीची ओढे नाले सफाई असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजार
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यूरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
MAHA DISCOUNT offer
in Any Course
Just 1800/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

खाऱ्या पाण्याला बनवा वापरण्यायोग्य
खाऱ्या पाण्याला सर्वोत्तम पर्याय..
इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर
मे. अभय सेल्स (कॉर्पोरेशन हार्डवेअर)
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# शहरातील विस्कळीत वाहतूक सुरळीत करा अन्यथा २९ मे रोजी 'चक्काजाम आंदोलन'


शहरातील विस्कळीत वाहतूक सुरळीत करा अन्यथा २९ मे रोजी सर्व ठिकाणी ठिय्या आंदोलन करून चक्काजाम आंदोलनाचा इशारा देणारे निवेदन कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना देण्यात आले. (छाया - लहू दळवी)

नगर - शहरातील केडगाव, कायनेटीक चौक, सक्कर बिस्किट कारखाना, छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्टेट बँक चौक, कोठला स्टॅण्ड, महानगरपालिका मुख्य कार्यालय, तसेच शहर परिसरातील वाहतुक संपुर्णपणे विस्कळीत झाली असुन नागरीकांना तासन्तास वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रुग्णांना घेऊन जाण्याऱ्या ॲम्ब्युलन्सलासुद्धा वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अनेक रुग्णांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊन जिवीत हानी होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. या वाहतुक कोंडीबाबत नगरकरांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली असुन या वाहतुक समस्येमुळे नागरीक प्रचंड त्रस्त झालेले आहे. या समस्येवर तोडगा निघुन वाहतुक सुरळीत न झाल्यास २९ मे रोजी सकाळी ११ वा. कोतवाली पोलिस स्टेशन व तोफखाना पोलिस स्टेशनच्या आवारात तसेच उड्डाणपुलाजवळ, शिल्पा गार्डनच्या समोर तसेच कोठला स्टॅण्ड जवळील उड्डाणपुला शेजारी एकाच वेळी या सर्व ठिकाणी ठिय्या आंदोलन करून चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष संपत भारस्कर, अजिंक्य बोरकर, सुरेश बनसोडे, वैभव ढाकणे, राजेश भालेराव, दीपक खेडकर, राहुल कातोरे, गिरीश जगताप आदी उपस्थित होते.

वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला असून त्याचा त्रास शहरातील नागरिकांना होत आहे. महिला-भगिनी आपल्या दुचाकी गाडीवरून प्रवास करीत असताना त्यांचे अतोनात हाल होत आहेत. तसेच शाळकरी मुले सायकलवरून प्रवास करीत असताना मोठ्या समस्येला सामोरे जात आहे. महामार्गावर ठिकठिकाणी अतिक्रमण असून यामुळे देखील वाहतूक कोंडी होत आहे. तसेच वाहतूक कोंडीमुळे दुर्दैवाने एखाद्या दिवशी मनुष्य हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी वाहतूक कोंडीचा प्रश्न पोलीस प्रशासनाने नियोजन करून मार्गी लावावा, अशी मागणी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी व्यक्त केली.

## प्रेरणादायी अक्षरधन...



### भावनांवर लक्ष ठेवा- आनंदी रहाल

'द लॉज ऑफ ह्युमन नेचर' या रॉबर्ट ग्रीन यांच्या पुस्तकात मानवी स्वभाव व एकूणच मनाच्या रहस्येविषयी उपयुक्त माहिती आहे.

तुम्हाला राग आला असेल तर विचार करा की, हा राग नाही. क्षुल्लक गोष्टींतून आला आहे का? त्यामागे काहीतरी किंवा कोणीतरी आहे हे नक्की. संवेदनशील परिस्थितींच्या खोलवर जा म्हणजे ते कुठून सुरू झाले हे कळेल.

तुमच्या मनाची लवचिकता बालपणात जशी होती तशीच ठेवण्याचा प्रयत्न करतांना ती निष्पाप, निरागसता पुन्हा आणा. एकीकडे तुमच्यासाठी प्रत्येक गोष्टीत रस असणे महत्त्वाचे आहे तर दुसरीकडे सर्व कल्पना आणि श्रद्धा तपासणेही महत्त्वाचे आहे.

आपल्या नशिबावर नियंत्रण असल्याची तुम्ही कल्पना करू इच्छिता; पण तुमच्या भावना किती खोलवर तुमच्यावर वर्चस्व गाजवतात, याची जाणीव तुम्हाला असते. त्या तुम्हाला तुमच्यिा आधीच विश्वास असलेल्या कल्पनांकडे परत वळण्यास भाग पाडतात. तुमच्या सध्याच्या मनःस्थितीत तुम्हाला जे पाहायचे आहे ते पाहण्यासाठी प्रेरित करतात.

अशी परिस्थिती टाळण्यासाठी आपल्या भावनांवर बारकाईने लक्ष ठेवा. तुमचा विवेक या भावनिक परिणामांना रोखू शकतो. हे सहजासहजी घडत नाही. आपल्याला ही शक्ती निर्माण करावी लागेल. तुम्ही दुःखी भावना ओळखायला शिकता तेव्हा आनंदी होण्याची शक्यता वाढते. तुमचा स्वभाव जाणून घ्या, रागाची कारणे शोधा, आपले मन लहान मुलासारखे ठेवा; निष्पाप निरागसता आपलं जीवन झुळझुळत्या झऱ्यासम सहज सुंदर निर्मळ होईल यावर विश्वास ठेवा.

संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

## अरविंद मसोजी यांचे अल्प आजाराने निधन



नाशिक - पंचवटी येथील व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरचे निवृत्त प्राचार्य अरविंद मसोजी (वय ७८) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी कृपा, मुलगी मालविका मसोजी, जावई रतिश येरंधिकर, पुतण्या शशिकांत, वहिनी निर्मला, वहिनी ललिता, बहीण कालिधी थॉमस, भाऊजी चेरियान थॉमस असा परिवार आहे.

# शहराच्या मध्यवर्ती भागात सुरु असलेल्या कुंटणखान्यावर पोलिसांनी टाकला छापा

### बनावट ग्राहक पाठवून केला पर्दाफाश, तीन महिलांची सुटका

नगर - शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या डांगे गल्ली येथील गुजराथी लॉजमध्ये सुरु असलेल्या कुंटणखान्यावर कोतवाली पोलिसांनी २६ मे रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास छापा टाकत लॉज चालकासह ७ जणांना ताब्यात घेतले. तसेच या ठिकाणी असलेल्या ३ महिलांची सुटका करण्यात आली. पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून या कुंटणखाण्याचा पर्दाफाश केला आहे.

माणिक चौकाजवळ असलेल्या डांगेगल्ली येथील गुजराथी लॉजमध्ये कुंटणखाना चालविण्यात येत असल्याची माहिती कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी पोलिस पथक नेमून कारवाईचे नियोजन केले. मिळालेल्या माहितीची खात्री करण्यासाठी अगोदर तेथे बनावट ग्राहक पाठवण्यात आला. त्या बनावट ग्राहकाने तेथे जाऊन मावा खाऊन थुंकण्याच्या बहाण्याने पुन्हा बाहेर येऊन पोलिसांना इशारा केला. त्याच्याकडून त्या ठिकाणी वेश्याव्यवसाय सुरु असल्याची खात्री होताच पोलिसांनी अचानक छापा टाकून काउंटरवर बसलेल्या इसम राजेंद्र प्रमोद अल्हाट (वय ४३, रा. माधवनगर, केडगाव) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे महिला व ग्राहकांबाबत विचारपूस केली असता त्याने महिला व ग्राहक खोलीमध्ये असल्याचे सांगितले.

पोलिसांनी खोलीमध्ये पाहणी केली असता पोलिसांनी पाठवलेल्या बनावट ग्राहकाने दरवाजा उघडला. त्यावेळी त्या खोलीमध्ये एक महिला मिळून आली तिच्याकडे चौकशी केली असता तिने राजेंद्र अल्हाट हा ग्राहकाकडून पैसे घेऊन त्यांचेबरोबर शरीरसंबंध करण्यासाठी खोलीत पाठवतो असे सांगितले. पोलिसांनी तेथील इतर खोल्यांची पाहणी केली असता तेथे वेगवेगळ्या खोल्यांमध्ये ६ पुरुष तसेच आणखी २ महिला मिळून आल्या. पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेतले.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात महिला पो. हे.कॉ. रोहिणी दरंदले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लॉज मालकासह तेथे आढळून आलेल्या ७ पुरुषांच्या विरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम १४३ (३) सह स्त्रियांचे अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रताप दराडे हे करीत आहेत.

# माळीवाड्यापाठोपाठ तारकपूर बसस्थानकातही महिलेच्या पर्समधील सोन्याच्या दागिन्यांची चोरी

नगर - एसटी बसने प्रवास करण्यासाठी बसमध्ये प्रवेश करीत असताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने महिला प्रवाशाच्या पर्समधील सोन्याचांदीचे दागिने ठेवलेले छोटे पाकीट आतील दागिन्यासह चोरुन नेले. ही घटना सावेडी परिसरातील तारकपूर बसस्थानक येथे २६ मे रोजी सकाळी ११.५५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत ज्योती संदीप जराड (वय ३४, रा. सिताराम सिंग चाळ, दहिसर, ईस्ट मुंबई) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या काही कामानिमित्त अहिल्यानगर येथे नातेवाईकांकडे आल्या होत्या. येथील काम संपवून मुंबई येथे जाण्याकरिता त्या तारकपूर बसस्थानक येथे गेल्या. तेथे मुंबईला जाण्याकरिता भूम ते बोरीवली एसटी बस लागल्याने फिर्यादी या बसमध्ये बसण्याकरिता गर्दीतून आत जात असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी यांच्या उजव्या खांद्यावरील पर्सची चैन खोलून आतील सोन्या-चांदीचे दागिने ठेवलेले पाकीट चोरुन नेले.

बसमध्ये बसल्यानंतर फिर्यादी यांनी पर्स पाहिली असता पर्सची चेन उघडी दिसल्याने त्यांनी आतील दागिने ठेवलेले पाकीट पाहिले असता ते मिळून आले नाही. फिर्यादी यांनी त्यांच्या दागिन्याचे पाकीट पर्समध्ये तसेच एसटी बस मध्ये पाहिले असता ते कोठेही मिळून आले नाही. यावरुन त्यांची खात्री झाली की कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या पाकिटामधील २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, ८ ग्रॅम वजनाचे कानातील सोन्याचे एक जोड,१० ग्रॅम वजनाची सोन्याची चेन, ७ ग्रॅम वजनाचे कानातील तीन लहान जोड, सोन्याचा ओम आणि ४० ग्रॅम वजनाचे चांदीचे एक ब्रासलेट असा ऐवज चोरुन नेला. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी ज्योती जराड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०५ (ब) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## पोलीस अंमलदाराचा ह्रदयविकाराने मृत्यू


महादेव कराळे

नगर - एमआयडीसीतील वखार महामंडळ येथे गार्ड म्हणून ड्युटीवर असलेल्या पोलीस अंमलदाराचा ह्दयविकाराने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २४ मे रोजी सकाळी घडली. महादेव यशवंत कराळे (वय ५०, रा. इसळक, ता. नगर) असे मयत पोलीस अंमलदाराचे नाव आहे.

अंमलदार महादेव कराळे हे सेवानिवृत्त सैनिक होते. सेवानिवृत्तीनंतर ते जिल्हा पोलीस दलात भरती झाले होते. त्यांची नियुक्ती वखार महामंडळ, एमआयडीसी येथे ईव्हीएम मशीन गार्ड ड्युटीवर होती. नेहमीप्रमाणे ते २४ मे रोजी सकाळी ड्युटीवर असताना त्यांच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने उपचारासाठी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. यासंदर्भात एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक भाऊ, एक बहिण, दोन मुले, पुतणे असा मोठा परिवार आहे. बाबासाहेब कराळे यांचे बंधू तसेच वांबोरी येथील आकाश कृषी सेवा केंद्राचे संचालक आकाश कराळे, पवन कराळे यांचे वडिल होत.

## शकुंतलाबाई महाले यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - रंगारगल्ली येथील रहिवासी शकुंतलाबाई शंकर महाले (वय ८८) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. जुन्या पिढीतील आयुर्वेदिक तज्ञ स्व. डॉ.एस.टी महाले यांच्या त्या पत्नी व डॉ.उदय महाले यांच्या त्या मातोश्री होत. रविवारी सायंकाळी स्व.शकुंतला महाले यांच्यावर अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात मुलगा डॉ.उदय, स्नुषा कल्पना, मुली उषा, उर्मिला, उज्वला, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

श्रीमंत घरात जन्मलेल्या शकुंतलाबाई यांनी समाजवादी नेते डॉ.एस.टी.महाले यांच्याबरोबर गरीबीत व संघर्ष करीत संसार केला. डॉ.महाले यांच्या समाजवादी विचारसरणीचा अंगिकार करीत शकुंतला यांनी विविध आंदोलनात भाग घेतला.तसेच अनेकवेळा तुरूंगवास देखील भोगला. काटकसरीने संसार करीत असतांना त्या अनेकवेळा रात्री अपरात्री देखील कार्यकर्त्यांना हसतमुखाने जेवण बनवून देत असत. आणीबाणीच्या काळात समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते म्हणून डॉ.महाले हे राजकीय कैदी म्हणून नाशिक जेलमध्ये बंदिस्त होते.त्यावेळी महाले यांची मुले शिक्षण घेत होती. मात्र अतिशय विपरित स्थितीत देखील शकुंतला यांनी अतिशय धीराने परिस्थितीचा सामना करीत सर्व कुटुंब सावरले होते. शिक्षण घेत असलेल्या डॉ. उदय यांना देखील आणीबाणीच्या काळात पोलीसांनी चौकशीसाठी पोलीस कस्टडीत ठेवले होते.त्यावेळी देखील शकुंतला यांनी रात्रीच्या वेळी पोलीस स्टेशन मध्ये धाव घेत पोलीसांना जाब विचारून जेरीस आणले होते. ज्येष्ठ समाजवादी नेत्या मृणाल गोरे यांच्या बरोबर एका हंडा मोर्चा आंदोलनात देखील शकुंतला यांनी सहभाग घेतला होता. शकुंतला यांनी अतिशय धीराने व कुशलतेने आपल्या सर्व मुलांवर उत्तम संस्कार केले. अहिल्यानगरच्या अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंसाकाराच्या वेळी अनेकांनी स्व.शकुंतला महाले यांच्या विषयीच्या आठवणींना उजाळा दिला.

# मुला-मुलींच्या समान लिंगगुणोत्तरासाठी गावपातळीवर मुलींच्या जन्माविषयी व्यापक जागृती करा:जिल्हाधिकारी


गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायदा व आरोग्य विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

नगर - जिल्ह्यात मुला-मुलींच्या लिंगगुणोत्तराचे प्रमाण समान राहण्याच्यादृष्टीने गावपातळीवर मुलींच्या जन्माविषयी व्यापक स्वरुपात जागृती करावी. तसेच गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायदा व आरोग्य विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण, पोलीस उपअधीक्षक जी.आर.उगले, प्र. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ नंदकुमार नेहरकर, जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. सतीष पाटील, महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी सतीष राजुरकर, विधी समुपदेश ॲड. सारीका सुराशे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यात मुलांच्या तुलनेत मुलींचे कमी असलेले प्रमाण समान होण्याच्यादृष्टीने अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दक्षपणे काम करावे. अनाधिकृतपणे गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान करणाऱ्या सोनोग्राफी केंद्राची माहिती घेऊन केंद्राची तपासणी करावी. 'आमची मुलगी' या सार्वजनिक तक्रार प्रणालीबाबतचे माहिती फलक जिल्ह्यातील सर्व ग्रामीण, प्राथमिक रुग्णालयात दर्शनी भागात लावण्यात यावेत. लिंगगुणोत्तराची गावनिहाय माहिती एकत्रित करत ज्या गावांमध्ये लिंगगुणोत्तराचे मुलींचे प्रमाण कमी आहे अशा गावांवर लक्ष केंद्रीत करण्यात यावे. गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायद्यांतर्गत न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या खटले गतीने निकाली निघावेत यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पावसाळयात उद्भवणाऱ्या डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया यासारख्या आजाराच्या प्रतिबंधासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात. महानगरपालिका क्षेत्र तसेच लोकसंख्येने मोठ्या असलेल्या गावांमध्ये गृहभेटीचे नियोजन करत नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करून आजारांची पूर्वलक्षणे शोधावी. डास निर्मूलनासाठी किटकनाशक फवारणी, साचलेले पाणी हटवणे आणि निर्जंतुकता राखण्यावर भर द्यावा. खासगी दवाखान्यांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांची माहिती प्रशासनाकडे सादर करण्यात यावी. जिल्ह्यातील जन्म-मृत्यूच्या नोंदीबाबतही कार्यवाही करण्याच्या सूचनाही डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी दिल्या.

### खबरी बक्षिस योजनेंतर्गत १ लाख रुपयांचे बक्षिस

बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान व लिंग निदान करुन गर्भपात करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तक्रार देणाऱ्या व्यक्तीस दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी होऊन न्यायालयात गुन्हा दाखल झाल्यास शासनामार्फत एक लक्ष रुपयांचे बक्षिस देण्यात येते. तसेच संशयित केंद्रात गर्भवती महिलेच्या मदतीने स्टींग ऑपरेशन करुन गर्भलिंग निदान व गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांना रंगेहाथ पकडण्याकरिता शासनास मदत केलेल्या गरोदर महिलेसही शासनामार्फत एक लक्ष रुपयांचे बक्षिस देण्यात येते. जनतेची काही तक्रार असल्यास 'आमची मुलगी' या सार्वजनिक तक्रार प्रणालीच्या १८००२३३४४७५ (१०४) या क्रमांकावर अथवा http://amchimulgimah.in या संकेतस्थळावर तक्रार करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चव्हाण यांनी गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायद्यांतर्गत जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या कामांची माहिती दिली.

# अहिल्यानगर शहरातील नव्या सबस्टेशनला लवकरात लवकर जागा उपलब्ध करून द्यावी

### भाजपाचे ज्ञानेश्वर काळे यांची पालकमंत्र्यांकडे मागणी


जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना निवेदन देऊन चर्चा करताना भाजपाचे शहर सचिव ज्ञानेश्वर काळे.

नगर - अहिल्यानगरमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात विजेचा खेळखंडोबा सुरु आहे. त्यामुळे जनता हैराण झाली आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी पालकमंत्री म्हणून लक्ष घालून नव्या २ सब स्टेशनसाठी लवकरात लवकर जागा उपलब्ध करून देण्याची मागणी भाजपाचे शहर सचिव ज्ञानेश्वर काळे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन ज्ञानेश्वर काळे यांनी निवेदन दिले. यावेळी मंत्री विखे यांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याशी याबाबत चर्चा करून लवकरात लवकर सबस्टेशनसाठी जागा उपलब्ध करून देण्याची सूचना केली. यावेळी शशांक कुलकर्णी व कार्यकर्ते उपस्थित होते.

ज्ञानेश्वर काळे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, नगर शहरात सावेडी व सारसनगर येथे महावितरणचे २ सबस्टेशन मंजूर झाले आहेत. त्यासाठी जागेची मागणी महावितरण मनपाकडे वारंवार करत आहे. सर्व लोकप्रतिनिधीनीही मनपाकडे महावितरणला जागा देण्यासाठी मागणी लावून धरल्यानंतर आयुक्तांनी सावेडीची जागा देण्याचे मान्य केले आहे. परंतु जागेपोटी ३.२५ कोटी आणि इतर कर असे मिळून ८.५ कोटी रुपयाची मागणी केली. मात्र महावितरणचे अधिकारी प्रोजेक्ट कॉस्टमध्ये वाढ होईल म्हणून असमर्थता दाखवत आहेत. त्यामुळे बऱ्याच दिवसांपासून हा निर्णय प्रलंबित आहे. जर नगर शहरात दोन नवे सब स्टेशन झाले नाही तर थोड्याच दिवसात नगर शहर अंधारात जाईल. आता सुद्धा विजेचा खेळखंडोबा चालू आहे, भविष्यात नवीन एक ही विद्युत कनेक्शन देता येणार नाही. त्यामुळे पालकमंत्री या नात्याने ह्या विषयात लक्ष घालावे व प्रश्न मार्गी लावून शहरावरील विजेचे संकट दूर करावे.

# शहराचा स्थापना दिवस २८ मे रोजी होणार साजरा

नगर - ऐतिहासिक अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त २८ मे रोजी सकाळी ९ वाजता शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा येथील कबरीवर नगरकरांच्या वतीने चादर अर्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी सर्व नगरकरांना उपस्थित राहण्याचे आवाहन हाजी अजीजभाई चष्मावाला प्रतिष्ठानचे हाजी मन्सूरभाई शेख, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर, अहमदनगर इतिहासप्रेमी मंडळाचे अभिजीत वाघ व भैरवनाथ वाकळे यांनी केले आहे.

शहराच्या वैभवशाली इतिहास जाणून घेण्यासाठी व शहर वसविणाऱ्या राजाची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जगात फार कमी शहरे अशी आहे, ज्यांचा स्थापना दिवस माहिती आहे, त्यापैकी एक अहमदनगर शहर असून, संस्थापक अहमद निजाम शहा यांनी २८ मे १४९० रोजी वसविले.

दरवर्षी शहराच्या स्थापना दिनानिमित्त हा उपक्रम राबविण्यात येत असतो. प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात शहराच्या ऐतिहासिक आठवणींना उजाळा दिला जाणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अभियांत्रिकी पदविका (पॉलिटेक्निक) प्रवेश प्रक्रिया सुरु

**१६ जूनपर्यंत चालणार नोंदणीची प्रक्रिया, विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा : प्राचार्य डॉ. ए. एम. आगरकर**

नगर – राज्य तंत्रशिक्षण विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५ –२६ करीता होणाऱ्या पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेसाठी नगरच्या शासकीय तंत्रनिकेतन येथे प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहे. दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाच्या पदविका अभ्यासक्रमांचा पर्याय उपलब्ध होत असून अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया २० मे पासून सुरु झाली आहे. ती १६ जून पर्यंत चालणार आहे.

विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज ऑनलाईन भरायचे आहेत. ऑनलाईन पद्धतीमध्ये E- Scrutiny , Physical Scrutiny असे दोन पर्याय आहेत. विद्यार्थी व पालकांची सुविधा केंद्रांवर होणारी गर्दी टाळण्यासाठी E- Scrutiny पर्याय निवडावा, अशी विनंती विद्यार्थी व पालकांना करण्यात आली आहे. Physical Scrutiny या पर्यायामध्ये विद्यार्थ्याला ऑनलाईन फॉर्म भरून, प्रिंट घेऊन सर्व मुळ कागदपत्रांसह सुविधा केंद्रावर उपस्थित राहून अर्ज निश्चित करणे आवश्यक आहे.

फॉर्म भरण्यासाठी मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी आवश्यक आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी दहावीची मूळ गुणपत्रिका मिळण्याची वाट न पाहता प्रवेश प्रक्रियेसाठी विहित मुदतीत प्रवेश अर्ज भरण्यासाठी नगरच्या शासकीय तंत्रनिकेतन येथील सुविधा केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा नोडल अधिकारी डॉ. ए. एम. आगरकर यांनी केले आहे. अधिक माहिती साठी प्रवेश प्रक्रिया अधिकारी शिवाजी बडेकर (९४२१३३५२९०) व अनंत जोशी (८०८७५६०९१३) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अहमदनगर जिल्ह्यात एकूण २८ तंत्रनिकेतने असून ७००० हून अधिक जागा आहेत. शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर या संस्थेत एकूण ५२० विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेसह स्थापत्य (सिव्हील) अभियांत्रिकी (६० जागा), यंत्र (मेकॅनिकल) अभियांत्रिकी (१२० जागा), अणूविद्युत अभियांत्रिकी (६० जागा), उपकरणीकरण अभियांत्रिकी (४० जागा), संगणक अभियांत्रिकी (६० जागा), उत्पादन अभियांत्रिकी (६० जागा), विद्युत (इलेक्ट्रिकल) अभियांत्रिकी (६० जागा), संगणक (कॉम्प्युटर टेकनॉलॉजी) तंत्रशास्त्र (६० जागा) अशा ८ पदविका अभ्यासक्रमांच्या शाखा कार्यान्वित आहेत.

तसेच मागील दोन शैक्षणिक वर्षात कॅम्पस मुलाखती मध्ये ४०० पेक्षा जास्त इच्छुक विद्यार्थ्यांची निवड विविध नामांकित कंपनीमध्ये झाली असून त्यांना ३.७५ लाखांचे वार्षिक वेतन मिळाले आहेत. तसेच कॅम्पस मुलाखतीची प्रक्रिया अजूनही सुरु असून प्रत्येक पात्र विद्यार्थ्याला नोकरीच्या विविध संधी शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर उपलब्ध करून देत आहेत.

**प्रथम वर्ष पॉलिटेक्निरक प्रवेशाचे वेळापत्रक**

ऑनलाइन अर्ज नोंदणी मुदत : २० मे ते १६ जून, २०२५

तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार : १८ जून, २०२५

तात्पुरत्या गुणवत्ता यादीवर आक्षेप नोंदविण्यासाठी मुदत : १९ जून ते २१ जून, २०२५

अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध : २३ जुन, २०२५

अधिक माहितीसाठी खालील संकेत स्थळावर भेट द्यावी.

प्रथम वर्ष पदविका–https://poly25.dtemaharashtra.gov.in/

**प्रवेशासाठी खालील कागदपत्रे आवश्यक**

दहावीची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा मूळ दाखला, जात/जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (एससी आणि एसटी वगळून), राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र (लागू असल्यास), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गासाठी ई.डब्लू .एस. प्रमाणपत्र (लागू असल्यास), दिव्यांग बाबतचे प्रमाण पत्र (लागू असल्यास), सैन्य दलातील संवर्गातून प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारासाठी सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास), अनाथ उमेदवारांसाठी सक्षम सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केल्याचे प्रमाणपत्र (लागू असल्यास).

## न्यु आर्टस् महाविद्यालयात २९ मे रोजी करिअर मेळावा

नगर – न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने इयत्ता बारावी व दहावी परीक्षेमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ व त्याचबरोबर दहावी व बारावीनंतर नोकरीच्या संधी यासंदर्भात करिअर मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब सागडे यांनी दिली. २९ मे रोजी न्यू आर्टस् महाविद्यालयातील राजर्षी शाहू सभागृहात सकाळी ९:३० वा. होणाऱ्या या करिअर मेळाव्यात पुणे येथील प्राचार्य डॉ. संजय चाकणे हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे राहणार आहे.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदार अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षा उत्तीर्ण सर्व विद्यार्थी व पालकांनी या करिअर मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने उपप्राचार्या कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक सुभाष गोरे यांनी केले आहे.

## आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये ४ जूनला बहुराष्ट्रीय कंपन्यांचा मेगा प्लेसमेंट ड्राईव्ह

नगर – चास येथील आडसूळ टेक्निकल कॅम्पसमध्ये दरवर्षी मेगा प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन केले जाते. या महाविद्यालयाने आजपर्यंत २३९४ शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून दिलेली आहे.

याही वर्षी महाविद्यालयाद्वारे ९ वा मेगा प्लेसमेंट ड्राईव्ह ४ जून रोजी सकाळी ९:३० वा. आयोजित करण्यात आलेला आहे. यासाठी इंजिनियरिंग, एमबीए, पॉलिटेक्निक, आयटीआय, बीबीए, बीसीए, बी.फार्म, बीए, बी.कॉम, बी.एस्सी, बी.एस्सी कॉम्प्युटर सायन्स हे सर्व विद्यार्थी यासाठी पात्र राहतील अशी माहिती महाविद्यालयाचे डायरेक्ट व प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील यांनी दिली. साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष प्रा. अनिरुद्ध आडसूळ यांचे स्वप्न आहे की, आपण आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नोकरी उपलब्ध करून देतच आहोत त्याचबरोबर, शहरी आणि ग्रामीण भागातील सर्व ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी आपण दरवर्षी एक मेगा प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित करून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात यावी असेही त्यांनी सांगितले.

सदर रोजगार मेळाव्यासाठी पुणे शहरातील तिरुमला ग्रुप चाकण, पुणे एंटरटेनमेंट इलेक्ट्रिकल प्रायव्हेट लिमिटेड, यशवी ग्रुप चाकण पुणे इलेक्ट्रिकल प्रायव्हेट लिमिटेड, क्विस्ट बजाज ऑटो चाकण पुणे प्रायव्हेट लिमिटेड, टाटा कन्सल्टन्सी लिमिटेड, अहिल्यानगर शहरातील लॉर्ट्स कुंडसेन लिमिटेड, सीजी इंडस्ट्रियल सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड, एक्साईड इंडस्ट्रीज लिमिटेड, जेएम अल्युएक्स्ट प्रोफाइल प्रायव्हेट लिमिटेड, क्लासिक व्हील प्रायव्हेट लिमिटेड, एपिटोम कंपोनंट प्रायव्हेट लिमिटेड, इंडोस्कल्प ऑटो कॉम्प. प्रायव्हेट लिमिटेड, टेक्नोट्रॅक इंजिनिअरिंग, ईटॉन इंडस्ट्रियल सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड, सिद्धी फोर्ज प्रायव्हेट लिमिटेड, सिद्धी प्रिसिसन प्रायव्हेट लिमिटेड, बजाज पॉवर इक्विपमेंट प्रायव्हेट लिमिटेड, सुपा शहरातील पॉवर इंडस्ट्रीज सी–१८, एपिटिओम प्रायव्हेट लिमिटेड, जाफा प्रायव्हेट लिमिटेड अशा १९ कंपन्या सहभागी होणार आहेत. वरील रोजगार मेळाव्याकरिता खालील लिंक द्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. https://tinyurl.com/5e32srns. अधिक माहिती करिता खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा ७४९९७९३८२३,८६६९२०६६२१

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्यानुसार वार्षिक पॅकेज मिळणार असून ४ जून रोजी संध्याकाळी लगेच त्यांना नियुक्ती पत्र देण्यात येणार आहे, अशी माहिती कॅम्पस डायरेक्टर व प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील यांनी दिली. २०११ मध्ये स्थापित आडसूळ शैक्षणिक संकुल याची नेहमीच दर्जेदार शिक्षण, स्किल डेव्हलपमेंट व अन्य दर्जाची नोकरी जास्तीत जास्त तरुणांना यासाठी सदैव तत्पर राहिल अशी तत्पर ग्वाही अनिरुद्ध आडसूळ यांनी दिली.




खेलो इंडिया मल्लखांब राष्ट्रीय स्पर्धेत नगरचा ओम सानप रौप्य पदकाचा मानकरी ठरला.

## खेलो इंडिया मल्लखांब राष्ट्रीय स्पर्धेत नगरचा ओम सानप रौप्य पदकाचा मानकरी

नगर – भारत सरकारचा उपक्रम खेलो इंडिया बीच गेम २०२५ नुकत्याच गुजरातमधील ब्ल्यू फ्लॅग बीच दिव दमन येथे झाल्या. या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र मल्लखांब संघामध्ये अहिल्यानगरचा उदयोन्मुख खेळाडू ओम घनश्याम सानप याने सांघिक क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करून. द्वितीय क्रमांकाचे रौप्य पदक प्राप्त केले.

या स्पर्धा पुरलेला मल्लखांब, टांगता मल्लखांब तसेच दोरीवरील मल्लखांब या क्रीडा प्रकारात घेण्यात आला. या तीनही प्रकारामध्ये ओम सानप तसेच महाराष्ट्र संघाने उत्कृष्ट कामगिरी करून द्वितीय क्रमांकाचे विजेतेपद मिळविले. ठाणे येथे झालेल्या राज्य निवड चाचणी स्पर्धेतून राज्यातील उत्कृष्ट सहा मुलांची या स्पर्धेसाठी निवड करण्यात आली होती. सर्वच खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. ओम सानप हा श्री रामअवतार मानधना चारिटेबल ट्रस्ट अंतर्गत एम. एम. वाय. टी. सी. या क्लबचा खेळाडू असून गेल्या पाच वर्षांपासून तो मुख्य प्रशिक्षक उमेश झोटिंग, प्रणिता तरोटे, आप्पा लाडाने आदींच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. ओमच्या या यशाबद्दल श्री रामअवतार मानधना चॅरिटेबल ट्रस्टचे ट्रस्टी मोहन मानधना यांनी अभिनंदन केले.

## केजी महाविद्यालयात २०२५- २६ करता प्रवेश सुरू



किशोर मुनोत स्वाती मुनोत

नगर – श्री केशरचंद गुलाबचंद मनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित केजी कला व वाणिज्य महाविद्यालय हे २००७ साले अहिल्यानगर मध्ये सुरू झाले. महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त हे महाविद्यालय असून जिल्ह्यातील पहिले सायंकाळी महाविद्यालय म्हणून नावारूपाला आलं असून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे एक संधीच व्यासपीठ ठरलेला आहे.

केजी महाविद्यालयात बीए, बीकॉम यामध्ये बँकिंग अँड फायनान्स, कॉस्ट अँड वर्क अकाउंटिंग, मार्केटिंग, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन असे स्पेशलिजेशन उपलब्ध आहेत. त्याचबरोबर बीकॉम सीए म्हणजेच पूर्वीचे बीसीए आणि बीकॉम बिझनेस मॅनेजमेंट म्हणजेच पूर्वीचे बीबीए हे पदवी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. नव्या शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या रोजगार क्षमतेवर भर देणारे अनेक कोर्सेस महाविद्यालयाने तयार केलेले आहेत. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या कौशल्यवृद्धी सोबतच आत्म विश्वास वाढवणारे आणि स्पर्धात्मक जगात यशाच्या दिशेने वाटचाल करणारे आहेत. यामध्ये पत्रकारिता, उद्योजकता विकास, ऑफिस ॲडमिनिस्ट्रेशन व ऑटोमेशन, चाणक्य कौशल्य विकास अंतर्गत रिसेप्शनिस्ट अभ्यासक्रम, सॉफ्ट स्कील, संज्ञापन विकास, पायथॉन व ज्येष्ठांसाठी मोफत संगणक साक्षरता अभ्यासक्रम अशा विविध अभ्यासक्रमाची रचना या महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून केली असून हे सर्व अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये नवी क्षितिजे निर्माण करत आहेत. महाविद्यालयाचा प्लेसमेंट रेकॉर्ड अत्यंत समाधानकारक असून अनेक विद्यार्थी विविध नामांकित कंपन्यांमध्ये आज यशस्वीरित्या कार्यरत आहेत. केजी महाविद्यालय केवळ पुस्तकी शिक्षण न देता विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी संवाद कौशल्य, संघटन क्षमता, नेतृत्व गुण यांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

केजी महाविद्यालयास महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण व उच्च शिक्षण भारत शिक्षण मंत्रालयाचा गौरव प्राप्त झाला असून येथे अत्याधुनिक संगणकला, डिजिटल क्लासरूम, अभ्यास केंद्र, ग्रंथालय, सेमिनार हॉल यांची सुविधा उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांसाठी सवलतीच्या शुल्कात अभ्यासक्रम, शासनाची शिष्यवृत्ती सुविधा, व सुरक्षित परिसर यामुळे येथे शिक्षण घेणे हा एक सुखद अनुभव ठरू शकतो. शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी व वंचित घटकांसाठी महाविद्यालयाने संगणक व माहिती तंत्रज्ञान क्षेत्र मोफत अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत यामुळे सामाजिक भान जपत शिक्षणाची मूल्ये रुजवण्याचं काम केजी महाविद्यालय सातत्याने करत आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या उज्वल भविष्यासाठी व आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी खाली दिलेल्या संपर्क क्रमांक वर संपर्क साधावा असे आवाहन संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत व महाविद्यालयाच्या कॅम्पस डायरेक्टर प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी कळविले आहे. महाविद्यालयाबाबत व अभ्यासक्रमाबाबत माहिती मिळवण्यासाठी खाली दिलेल्या क्रमांकवर संपर्क साधावा. संपर्क– ९८५०१३६६५४, ९०७५४३००८३, ९८३४७५६१४१ वेबसाईट–www.kgcollege.in Mail- kg.college@yahoo.com

# केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये २३ वर्षांनी माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

**जुन्या पाखरांच्या किलबिलाटने गजबजले हायस्कुल**

नगर – वाघ मळा, सावेडी (ता.जि. अहिल्यानगर) येथील केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीच्यावतीने माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याला २००२ च्या दहावी आदर्श बॅचचे विद्यार्थी, शिक्षकवृंद आणि पदाधिकारी उपस्थित होते. सर्वप्रथम आलेल्या माजी विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. प्रारंभी शाळेची घंटा वाजवून शाळा भरवण्यात आली. राष्ट्रगीत, राज्यगीत, प्रार्थना घेण्यात आली. नंतर विद्यार्थ्यांची हजेरी घेण्यात आली. त्यात ३० विद्यार्थी व १० विद्यार्थिनी उपस्थित होते. त्यानंतर मेळाव्याचे उद्घाटन महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी नामदेव गाडीलकर व अनिल शिंदे यांच्या हस्ते सरस्वती पुजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी सूत्रसंचालन माजी विद्यार्थिनी सौ.डॉ.जयश्री काळे व प्रास्ताविक दत्ता काळे यांनी केले. अनुमोदन सौ.सविता खोजे व आभार महेश शिंदे यांनी केले. या नंतर शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांचा सत्कार माजी विद्यार्थ्यांकडून करण्यात आला.



वाघ मळा, सावेडी येथील केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीच्यावतीने माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

यावेळी २३ वर्ष जुन्या आठवणीना उजाळा देत शालेय जीवनात शिक्षकांनी दिलेले ज्ञान व संस्काराप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. सन २००२ मध्ये दहावीची शालांत परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर वेगवेगळ्या दिशेला गेलेले मित्र–मैत्रिणींनी ठिकठिकाणाहून येऊन भेटल्याने भारावून गेले होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्नेहभेटीचा आनंद दिसत होता. भेटीला भावनेची किनार होती. सुमारे चाळीस माजी विद्यार्थी–विद्यार्थीनी यावेळी उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांच्या नोकरी व्यवसाय, कुटुंबाविषयी जाणुन घेतले. अनेक वर्षांनी एकत्र आल्याने विद्यार्थीदशेतील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. यावेळी शालेय जीवनात चांगल्या कामासाठी मिळालेली शाब्बासकी तर अभ्यासात कुचराई केल्याबद्दल मिळालेली शिक्षा, यातुन घेतलेला बोध व जीवनाला मिळालेली कलाटणी याचे अनुभव अनेकांनी यावेळी कथन केले. अनेक वर्षांनी मित्र भेटल्याचा परमोच्च आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याच्या संगोपनाचा निश्चय यावेळी करण्यात आला.

शाळेचे २००२ बॅचचे मुख्याध्यापक बाबासाहेब शिंदे यांनी भाषणात विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत सामाजिक बांधिलकी जपावी, तसेच शाळेतील आठवणींना उजाळा दिला.

विद्यमान मुख्याध्यापक अनिल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास ठेवून जीवनातील प्रत्येक आव्हानाला सामोरे जाण्याचा संदेश दिला.

विशेष पाहुणे चंद्रकांत डाके, सौ.जयश्री देशपांडे आणि सुरेश आवारे यांनीही भाषणातून माजी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले व त्यांच्या यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. माजी विद्यार्थ्यांपैकी सतीश आमले, सचिन आडोळे, रोहिदास बारस्कर, गणेश बारस्कर, देविदास ठाणगे, जालिंदर पाटोळे, रोहिदास पवार, प्रकाश भिंगारदिवे, सौ. कीर्ती गांडोळे, सौ.सविता वाकळे, सौ.सविता खोजे आदींनी शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी समाजात उच्च पदावर असलेले दहावी २००२ आदर्श बॅचचे माजी विद्यार्थी विद्यमान नगरसेवक व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष संपत बारस्कर यांचा सर्व शिक्षकांनी सत्कार केला. तसेच ज्यांच्या पुढाकारामुळे हा सस्नेह सोहळा पार पडला ज्यांनी सोहळ्याचे आयोजन नियोजन करून सर्वांना जेवण, हॉल, ऑर्केस्ट्रा उपलब्ध केला असे २००२ आदर्श बॅचचे माजी विद्यार्थी उद्योजक सचिन बारस्कर यांचा सत्कार करताना सर्व शिक्षकांना अश्रू अनावर झाले.

या मेळाव्यात २००२ च्या आदर्श बॅच यावतीने शाळेचे कर्मचारी सुरेश आवारे यांना नवीन सायकल माजी विद्यार्थी नवनाथ ससे व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते भेट देण्यात आली. या सोहळ्यात सर्वांनी डीजेच्या तालावर खुप धमाल व मस्ती केली. उपस्थित विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि कार्यक्रमाचा आनंद लुटला. यावेळी सचिन बारस्कर यांनी शाळेस ५१,०००/– शाळेच्या बांधकामास देण्याचे सांगून सोहळ्याची सांगता केली.



अहमदनगर महाविद्यालयातील एस.वाय.बी.सी.एस विभागातील विद्यार्थ्यांनी परिक्षेत यश मिळविले.

## नगर कॉलेजलच्या विद्यार्थ्यांचे एस.वाय.बी.सी.एस परिक्षेत यश

नगर – पुणे विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत अहमदनगर महाविद्यालयाच्या एस.वाय.बी.सी.एस. (द्वितीय वर्ष बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स) वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या परीक्षेत नागरे सायली गणेश (९१.८) हिने प्रथम, कोतकर शिवानी संतोष (९०.) हिने द्वितीय आणि शेख अदीबा बुऱ्हाण (८९.१) हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना महाविद्यालयाच्या वतीने त्यांच्या अभ्यासासाठी दिल्या गेलेल्या सुविधांबद्दल आणि अध्यापकांच्या मार्गदर्शनाची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या एकंदर प्रगतीसाठी महाविद्यालयाने घेतलेल्या विशेष उपक्रमांवर त्यांनी प्रकाश टाकला.

यावेळी बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रा. दिलीपकुमार भालसिंग आणि डॉ. सय्यद रज्जाक यांच्यासह अनेक प्राध्यापक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करावे : अशोक मुथा

**भाऊसाहेब फिरोदिया व रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या दहावी व बारावी मधील गुणवंतांचा सन्मान**

नगर – शिक्षणातून विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडणार आहे. विद्यार्थ्यांनी ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करावे. विद्यार्थ्यांच्या यशात शाळेतील गुरुजनांचा व पाठबळ देणाऱ्या आई–वडिलांचा मोठा वाटा असून, त्यांचा मान–सन्मान राखावा. मोठे झाल्यावर त्यांना कधीही विसरू नये, असे अशोक मुथा यांनी सांगितले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी (एस.एस.सी.) व बारावी (एचएससी) बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. या दोन्ही शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.



भाऊसाहेब फिरोदिया व रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या दहावी व बारावी मधील गुणवंतांचा सन्मान करण्यात आला.

भाऊसाहेब फिरोदियामधील इयत्ता दहावी बोर्डाचा १००% निकाल लागाल. यामध्ये ६१ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले. तर गणित आणि संस्कृतमध्ये प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहे. तसेच रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल ९९.३% निकाल लागला. ११३ विद्यार्थ्यांनी ७० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले. इयत्ता १२ वी विज्ञान शाखेचा निकाल १००%, तर कला शाखेचा ८८% निकाल लागला आहे.

भाऊसाहेब फिरोदिया शाळेत झालेल्या गुणगौरव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खजिनदार प्रकाश गांधी, सल्लागार समितीचे सदस्य भूषण भंडारी, भाऊसाहेब फिरोदियाचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, रूपीबाई बोराचे मुख्याध्यापक अजय बारगळ आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

प्रारंभी सरस्वती पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकात सचिन पवार यांनी दोन्ही शाळेतील वाढता गुणवत्तेचा आलेख सादर केला. विद्यार्थ्यांच्या सत्काराच्या नावांची घोषणा समृद्धी बिबवे यांनी केली. या गौरव सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते भाऊसाहेब फिरोदियामधील इयत्ता १० वी आणि रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या दहावी आणि बारावी बोर्डातील गुणवत्ता यादीत चमकलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाहक गौरव फिरोदिया, विश्वस्त अ‍ॅड. किशोर देशपांडे, अ‍ॅड. गौरव मिरीकर यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन शुभांगी जोशी यांनी केले. आभार रवींद्र पंडित यांनी मानले.

**गुणवत्ता यादीत चमकलेल्या पुढील विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला :–**

भाऊसाहेब फिरोदिया इयत्ता दहावी प्रथम– चैतन्य प्रकाश कार्ले (९९%, गणित १०० पैकी १००), द्वितीय– ओंकार संतोष चेमटे, सुमेध ऋषीकेश मुजुमदार (९८.२०% संस्कृत १०० पैकी १००), तृतीय– धीरज दादाभाऊ भांड, अनुष्का संतोष पोळ (९८%), चौथा– वरद संतोष दाणे (९७.६०%), पाचवा– यशोधन प्रद्युम्न सोनवणे (९७.४०%) आणि वेदांत गजानन गावंडे याने गणित तर श्रेयसी श्रीनिवास नागुल हिने संस्कृतमध्ये १०० पैकी १०० गुण मिळवले.

रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूल इयत्ता दहावी प्रथम– संचिता अशोक लांडगे (९४.६०%), द्वितीय– श्रध्दा शंकर बोरुडे (९३.२०%), तृतीय– मेघना चंद्रकांत अवधुत (९२.८०%), चौथी– स्नेहा विजय शिंदे (९२.४०%), पाचवी– ऋतू गणेश कळके (९२%).

इयत्ता बारावी विज्ञान शाखा प्रथम– सिध्दी गौतम नहार (७७.१७%), द्वितीय– ऋतूजा शरद जाधव (६५.८३%), तृतीय– आशिष किरण गहिले (६४.८३%).

बारावी कला शाखा प्रथम– भाग्यश्री यशवंत थोरात (८०.३३%), द्वितीय– वामन उत्तम निंबाळकर (७५.८३%), तृतीय– यश राहुल टिळेकर (६७.८३%).

# भारत सर्वांवर मात करत आपले काम योग्य पद्धतीने करून प्रगती साधत आहे

## आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक सल्लागार वैशाली करमरकर यांचे प्रतिपादन; ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प

नगर – भारताला वारंवार रक्तबंबाळ करण्यामागे पाकिस्तान जेवढा जबाबदार आहे तेवढेच त्यामागे जगातील काही शक्तींची रणनीती आहे. अशी कारस्थाने होतच रहाणार आहेत. पण आपण 'हाथी चले अपनी चाल, कुत्ते भोके हजार..' याप्रमाणे सर्वांवर मात करत भारत आपले काम योग्य पद्धतीने करून प्रगती साधत आहे, असे प्रतिपादन देशाच्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक सल्लागार वैशाली करमरकर यांनी केले.



विचार भारतीच्या ग.म.मुळे व्याख्यानमालेत देशाच्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक सल्लागार वैशाली करमरकर यांची मुलाखत घेताना माध्यमकर्मी डॉ.उदय निरगुडकर.

विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेचे द्वितीय पुष्प वैशाली करमरकर यांनी 'जागतिक अर्थकारणातील सांस्कृतिक आक्रमणे' या विषयाने गुंफले. यावेळी माध्यमकर्मी डॉ.उदय निरगुडकर यांनी वैशाली करमरकर यांची प्रकट मुलाखत घेतली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे माऊली सांस्कृतिक सभागृहाचे चेअरमन दिनकर घोडके होते. यावेळी रा.स्व.संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, मनीषा मुळे व भावना लांडगे यांनी पाहुण्याचे सत्कार केले. व्याख्यानास भर पावसातही नागरिक उपस्थित होते.

यावेळी वैशाली करमरकर यांनी सखोल विज्ञानावर आधारित व पुराव्यानिशी देशातील व जगातील घटनांचा पट अगदी सहज व सोप्या भाषेत संवाद साधत उलगडला. यातून अनेक चित्तथरारक घटना, जागतिक घडामोडी मागील अदृश्य शक्ती, आधुनिक युद्ध पद्धती व कथ्थ्यांचे युद्ध यावर भाष्य करून उपस्थितांना सध्याच्या परिस्थितीची जाणीव करून दिली.

वैशाली करमरकर पुढे म्हणाल्या, पाकिस्तानने जर शस्त्रसंधी टिकवली नाहीतर हाताने पाकिस्तान स्वतःची कबर खोदत आहे. भारताने ऑपरेशन सिंदूर मधून आपली सॉफ्ट, स्मार्ट व हार्ड पॉवर या तिन्ही शक्तींचा उत्तम मिलाफ करून दाखवला आहे. पाश्चात्य शक्तींनी सॉफ्ट पॉवर वापरून भारताला खिळखिळे करण्याचे जे कारस्थान केले होते त्यास आपण चतुर, मुत्सद्दी व दूरदर्शीपणे चोख उत्तर दिले आहे. मात्र आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी माध्यमे भारताची खोटी प्रसिद्धी करत असल्याने जगभर सर्वपक्षिय शिष्टमंडळ पाठवून भारताने आपल्या सॉफ्ट पॉवरचा षटकार मारला आहे. अमेरिका खूप बलाढ्य असल्याने युद्धखोर आहे. स्वतःकडे असलेल्या शक्तीमुळे तो जगातील प्रत्येक युद्धात जाणूनबुजून हस्तक्षेप करत आहे. युद्ध पद्धती बदलत आहे. आता पाचव्या युद्ध पद्धतीनुसार भारतावर धर्म व पंथावर, मनोविज्ञानिक युद्ध, सायबर वॉर असे हल्ले जाणूनबुजून भारतावर केले जात आहेत. २०१४ ते १८ दरम्यान परकीय शक्तींनी देशातील निवडणुकांमध्ये बदल घडवून आणणे, अचानक कन्हैया कुमार सारखी व्यक्ती उगवते व मावळते, शबरी मलाई, शनी शिंगणापूर प्रकरणी स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम वागणूक. या प्रकरणांना जाणीवपूर्वक वेगळा रंग दिला गेला. त्यामुळे जोवर आपण सजग राहून वॉशिंग्टन पोस्ट सारख्या माध्यमांवर व त्यांचे समर्थन करणाऱ्यांवर बहिष्कार घातला पाहिजे. तरच हे देश विरोधी कट कारस्थान थांबवू शकू. सर्वच जबाबदारी सरकारची नाहीये. आपणही काही जबाबदारी घेतली पाहिजे. आता अत्याधुनिक एआय टेक्नोलॉजीच्या युद्ध पद्धती पुढे येत आहे. खोटे कथ्थ्य पसरवणे हेही या नव्या युद्धाचाच भाग आहे.

यावेळी मुलाखतकार डॉ.उदय निरगुडकर यांनी विविध प्रश्न विचारत चर्चा खुलवत तोडीस तोड संवाद साधला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशारद पेटकर यांनी केले. प्रा.अशोक सागडे यांनी आभार मानले. शांती मंत्राने सांगता झाली.

# प्रभाग ११ मधील विविध नागरी समस्यांबाबत उपायोजना करा

## पालकमंत्र्यांना निवेदन

नगर – नागरी समस्या आरोग्य व महावितरण संदर्भात तसेच प्रभाग क्र. ११ मधील कोठी व गुलाबसिंग कंपाऊंड येथे पावसाच्या पाणी संदर्भात उपाययोजना, कोठी व मार्केट यार्ड दरम्यान जड वाहतूक बंद करण्याबाबत तसेच परिसरातील रस्त्या संदर्भात व रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात यावे व स्ट्रीट पोल लाईट लावण्यात यावे, अतिक्रमण विभागाने नोटीस न देता गोरगरिबांची राहती घरे तोडणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशा विविध मागण्यांचे निवेदन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना स्वप्निल शिंदे यांनी दिले. यावेळी नागरिक उपस्थित होते.



विविध मागण्यांसंदर्भात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देताना स्वप्निल शिंदे.

निवेदनात म्हटले आहे की, कोठी परिसरामध्ये आरोग्य विभागाचे कर्मचारी वारंवार कामचुकारपणा करतात व रस्त्यावरील कचराही उचलला जात नाही तसेच कोठी व गुलाबसिंग कंपाउंड परिसरात घंटागाडी सुरू करावी. धार्मिक स्थळ समोरील कचरा वेळेवर उचलत नसल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. महावितरण कार्यालय हे नेहमी विद्युत प्रवाह बंद करतात तेव्हा नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते त्यामुळे विद्युत प्रवाह सुरळीत करण्यात यावा. कोठी ते मार्केट यार्ड दरम्यान जड वाहतूक बंद करण्यात यावे, या रस्त्यावर लहान मुले व ज्येष्ठ नागरिक पायी ये-जा करतात, त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच इंदिरानगर झोपटपट्टी येथील गोरगरिबांच्या राहत्या घरांवर महापालिकेने कोणतीही नोटीस न देता कारवाई केली. तसेच या परिसरामध्ये पावसाचे पाणी घरात शिरत असल्याने ठोस उपाययोजना करण्यात याव्या, रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवावेत, कानडे मळा ते चौधरीनगर नवीन झालेल्या रस्त्यावर त्वरित स्ट्रीट लाईट बसवण्यात यावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना करण्यात आली आहे.



आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग माध्यमिक विद्यालयाचा एस. एस. सी. बोर्डाचा निकाल ९५ टक्के लागला.

# जय बजरंग विद्यालयाचा ९५ टक्के निकाल

नगर – आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित पाईपलाईन रोड येथील जय बजरंग माध्यमिक विद्यालयाचा एस. एस. सी. बोर्डाचा निकाल ९५ टक्के लागला. यात विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

कु. प्रांजल निकम हिने ९१ टक्के मिळवून प्रथम क्रमांक मिळविला, २) प्रगती सोमनाथ गायकवाड ९०.४०%, ३) आरती कैलास सोनवणे ८८%, ४) वरदा स्वागत साळे ८४ %, ५) ओम अनिल हिवाळे ८२ %, समृद्धी दिलीप लुंगसे ८२%.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, संस्थेचे सहसचिव उमेश गांधी, विद्यालयाच्या प्राचार्या सौ. संगिता पाठक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तसेच व्यवस्थापक आशितोष घाणेकर, वर्गशिक्षिका साळुंके मॅडम, देवकर सर, कुंजीर सर, गर्धे सर, टेमकर मॅडम, देठे मॅडम, वाघमारे मॅडम, माने सर, उबाळे सर, जोशी मॅडम आदी उपस्थित होते. तसेच उच्च माध्यमिक विभाग कला, विज्ञान व वाणिज्य या शाखेचा एच. एस. सी. बोर्डाचा निकालही उत्कृष्ट लागला.

# कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून पोलीस अधीक्षक घार्गे यांची ओळख

## डॉ. उद्धव शिंदे यांचे प्रतिपादन; 'स्नेहबंध'तर्फे नूतन पोलीस अधीक्षकांचा सत्कार

नगर – लोकाभिमुख आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची ओळख आहे, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.उद्धव शिंदे यांनी केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा डॉ. शिंदे यांनी सत्कार केला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक (नगर शहर) प्रशांत खैरे, अपर पोलीस अधीक्षक (श्रीरामपूर) वैभव कलुभर्मे, पोलीस उपअधीक्षक अमोल भारती व सर्व पोलीस अधिकारी पोलीस मुख्यालय, अहिल्यानगर येथे उपस्थित होते.



पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा सत्कार करताना 'स्नेहबंध' चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे. समवेत पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुभर्मे

डॉ. शिंदे म्हणाले, घार्गे यापूर्वी श्रीरामपूर येथे १ ऑगस्ट २००६ ते २२ जानेवारी २००९ या कालावधीत उपअधीक्षक म्हणून कार्यरत होते. घार्गे त्यांनी पोलीस दलाच्या आधुनिकीकरणावर मोठा भर दिला. रायगड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना स्मार्ट पोलीस ठाणे बनवण्यासाठी त्यांनी व्यापक प्रयत्न केले. पोलीसांना अत्याधुनिक वाहने उपलब्ध व्हावीत यासाठी प्रयत्न केले. पोलीस प्रशासनाला लोकाभिमूख करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शिस्तप्रिय आणि मितभाषी अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. आपल्या रुबाबदार, शैलीने गुन्हेगारीवर आळा घालतील असा विश्वास डॉ. शिंदे यांनी व्यक्त केला.

# शहर स्थापना दिनानिमित्त फोटोग्राफी स्पर्धेचे आयोजन

नगर – अहमदनगर शहराच्या ५३५ व्या स्थापना दिनानिमित्त मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी, रहेमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने अहमदनगर शहरातील निजामशाही काळातील, शिवशाही काळातील व इंग्रजांच्या काळातील जुन्या इमारतींचे फोटोग्राफीची स्पर्धा आयोजित करण्यात आली असल्याचे मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान यांनी सांगितले.




वरील तीनही काळातील कोणत्याही इमारतीचे फोटो काढून किंवा तुमच्याकडे संग्रहित असलेले फोटो ९८६०४७७८६९ या नंबर वर किंवा abidkhan1968gmail.com या मेलवर ३१ मे पर्यंत टाकावे. यामध्ये प्रथम बक्षीस रुपये ५००, द्वितीय ३००, तृतीय २०० रुपये रोख व प्रमाणपत्र देण्यात येईल, असे अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाचे अभिजीत वाघ यांनी सांगितले.

या स्पर्धेत भाग घ्यावा असे आवाहन आसिफ खान, भैरवनाथ वाकळे व युनुसभाई तांबटकर यांनी केले आहे.

# १ जून रोजी ब्राह्मण वधु-वर मेळाव्याचे आयोजन

नगर – अखिल ब्राह्मण संघ, पुणे आयोजित सर्व शाखीय ब्राह्मण समाजातील वधुंकरिता मेळावा १ जून रोजी सकाळी १० ते २ वाजेपर्यंत उद्यानप्रसाद मंगल कार्यालय, स्काऊट ग्राउंड समोर, सदाशिव पेठ, पुणे -३० येथे आयोजित केला आहे. वरांची खूप नावे अगोदरच आल्यामुळे फक्त वधुंनी उपस्थित राहावे असे आवाहन माजी जिल्हा न्यायाधीश चंद्रचूड गोंगले यांनी अखिल ब्राह्मण संघ पुणे यांच्यातर्फे केले आहे. वधुंनी मोबाईल नं. ९८९०४२२५६०, ९८९०३६६९३१ यावर त्वरित संपर्क साधावा. आधार कार्ड / ओळख पत्राची झेरॉक्स प्रत सोबत आणावी.





पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त भिंगार येथील श्री रोकडेश्वर हनुमान मंदिराची साफसफाई करून महिलांना साडी व मिठाईचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ व पदाधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर यांनी जनतेच्या हितासाठी लोककल्याणकारी योजना राबविल्या

## बाळासाहेब भुजबळ यांचे प्रतिपादन; त्रिशताब्दी जयंतीनिमित्त गरजू महिलांना साडी व मिठाईचे वाटप, श्री रोकडेश्वर हनुमान मंदिराची साफसफाई

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं पवित्र नाव आपल्या शहराला लाभलं आहे. ही अभिमानास्पद बाब आहे. अहिल्यादेवींनी आपल्या देशात विविध राज्यात गरजूंसाठी धर्मशाळा बांधल्या, नद्या स्वच्छ केल्या, रुंद केल्या, बंधारे, घाट बांधले, पुरातन मंदिरांचा जीर्णोद्धार केला. रयतेला आनंदी राहण्यासाठी त्यांच्यासाठी अनेक सुविधा निर्माण केल्या. चांगले, मजबूत रस्ते बांधले, उत्तम जलव्यवस्था निर्माण केली. खऱ्या अर्थानं रयतेच राज्य निर्माण केले. ते आदर्श पद्धतीने चालविले. आज अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी केले आहे.

भिंगार येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भाजपा ओबीसी मोर्चाच्या वतीने श्री रोकडेश्वर हनुमान मंदिराची साफसफाई व स्वच्छता करण्यात आली. तसेच गरजू महिलांना साडी व मिठाईचे वाटप करण्यात आले. महाराष्ट्र राज्य अंधत्व निवारण समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बाळासाहेब भुजबळ, उपाध्यक्ष वनिता बिडवे, महेंद्र जाधव, सरचिटणीस अनिल निकम, सचिन पावले, रोहित पठारे, राजू मंगलारम, श्रीकांत फंड, उपाध्यक्ष बाळासाहेब खताडे, कुंडलिक गदादे, संतोष हजारे, विनोद बोगा, सोमनाथ चिंतामणी, गणेश कांनगावकर, सचिन पळशीकर, दीपक देहेकर, सुरेश लोळगे, किशोर रायमोकर, चंद्रकांत मानकर, भिंगार भाजपाचे सरचिटणीस महेश नामदे, मंडल अध्यक्ष सचिन जाधव, राजेंद्र फुलारी उपस्थित होते.

महेंद्र जाधव यांनी सूत्रसंचालन केले. गणेश कानगांवकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# लोहार समाजातील ८० गुणवंत, पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांचा सत्कार

## शिक्षण परिषदेचा उपक्रम, निबंध स्पर्धेतील विजेत्यांचाही गौरव

नगर – अखिल महाराष्ट्र गाडीलोहार समाज विकास महासंघ, प्रणित, लोहार शिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्यतर्फे समाजातील दहावी, बारावी, स्पर्धा परीक्षा व इतर परीक्षेत यशस्वी झालेल्या ८० गुणवंत व समाजातील पदोन्नती मिळालेल्या अधिकारी तसेच पुरस्कार प्राप्त उद्योजक यांचा सत्कार करण्यात आला. लोहार शिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या निबंधलेखन स्पर्धेतील विजेत्यांचाही रोख रक्कम व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



अखिल महाराष्ट्र गाडीलोहार समाज विकास महासंघ, प्रणित, लोहार शिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्यतर्फे पुण्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी सौ. ज्योती कावरे यांचा पदोन्नती बद्दल मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

सावेडीतील हॉटेल द व्हाईट हाऊस येथे झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महासंघाचे सचिव प्रा.डॉ. एस. के. पोपळघट हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याच्या अतिरिक्त जिल्हाधिकारी ज्योती कावरे, शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, मिलिंद हिवलेकर, मुंबई विद्यापीठाच्या प्रा. डॉ. क्षमाली सोनटक्के उपस्थित होते.

शिक्षणाधिकारी बुगे म्हणाले, लोहार शिक्षण परिषद ही विद्यार्थी व पालकांना प्रेरणा देण्याचे काम करत आहे. लोहार समाज हा जिद्द व चिकाटीने व्यवसाय करतो. मातृभाषेची चांगली त्याचे विचार चांगले असतात. शिक्षण हे समाजाचे विकासाचे साधन आहे. आजच्या मोबाईल युगात वाचन महत्त्वाचे आहे वाचनामुळे अनेक चांगली माणसे घडली, असे ते म्हणाले.

अतिरिक्त जिल्हाधिकारी कावरे म्हणाल्या, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मोठ्या ध्येयापर्यंत पोहोचता येते. आज आपल्या समाजातील मुलेही चांगल्या पदावर कार्यरत आहेत याचा अभिमान आहे. समाज विकासासाठी व शैक्षणिक कार्यासाठी मदत देण्याची ग्वाही त्यांनी दिली. लोहार समाजाला पुढे जायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. स्पर्धा परीक्षेत आपली मुले आहेत. ते यश मिळवत आहेत. लोहार शिक्षण परिषद पाठीवर कौतुकाची थाप ठेवते आहे. त्यांना उभारणीच्या टप्प्यावर कौतुक होणे ही अभिमानास्पद बाब आहे.

तंत्रज्ञान पुढे जात आहे. कोकण जळगाव अमरावती या भागात समाजबांधव कार्यरत आहेत. समाजातील सर्व घटनांनी पुढे येऊन समाजाची प्रगती हाच उद्देश ठेवून कार्य केले तर आपण पुढे जाऊ रतन टाटायन पुस्तकात वाक्य वापरले संपत्ती निर्माण करणे ही कर्तव्याची बाब आहे. टाटा उद्योगसमूह मिठापासून विमान निर्मितीपर्यंत सर्वच क्षेत्रात आहे. आपल्या समाजातील स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी कमी आहेत. स्पर्धा परीक्षा ऑब्जेक्टिव्ह होती आता ती सब्जेक्टिवमध्ये आली आहे. मुलांनी अभ्यास करताना वाचन चिंतन मनन यांत मग्न रहावे. अभ्यासात सातत्य ठेवा. ध्येय निश्चित ठेवा. स्पर्धा परीक्षा ही खूप कष्ट करून ध्येय साध्य करण्याची गोष्ट आहे. पण ध्येय साध्य करूपर्यंत त्यापासून हटू नका, असे आवाहन कावरे यांनी केले. प्रा. हर्षल आगळे यांनी त्यांना दिलेल्या मानपत्राचे वाचन केले.

यावेळी जिल्ह्यातील १०वी १२वी बोर्ड परीक्षेतील, स्कॉलरशिप व इतर परीक्षेतील गुणवत्ता प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन गुणगौरव व निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.

नायब तहसीलदार राजेंद्र लाड, आयसीआयसीआय बँकेचे व्यवस्थापक प्रकाश लोखंडचुर, फॉरेन्सिक अधिकारी विलास हरेल, महापारेषणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता दीपक आगळे, जीएसटी अधिकारी गुरुप्रसाद लोहार यांचा पदोन्नती मिळाल्याबद्दल, तर समाज आर्थिक महामंडळासाठी उपोषण करणारे दादासाहेब कळसाईत, यशस्वी उद्योजक गोरख भालके, अमोल जवणे, निवृत्त एस टी कर्मचारी बाबासाहेब लोखंडचुर यांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात लोहार शिक्षण परिषदेचे उपसचिव प्रा. हर्षल आगळे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका मांडली तसेच प्रमुख पाहुणे यांची ओळख करून दिली. लोहार शिक्षण परिषदेच्या कार्याची माहिती दिली.

लोहार शिक्षण परिषदेचे राज्याध्यक्ष प्राचार्य सुभाष कौसे यांनी लोहार शिक्षण परिषदेमार्फत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. डॉ.साहेबराव पोपळघट यांनी महासंघाचे सहकार्य राहील असे जाहीर केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एकनाथ कौसे, दत्तात्रेय पोपळघट, प्रशांत जवणे, रोहिदास सोनवणे, डॉ. मच्छिंद्र गाडेकर, नंदकिशोर आगळे, वसंत थोरात, सुनील थोरात, श्रीहरी आगळे, हर्षल जवणे, सौरभ जवणे यांनी प्रयत्न केले. सूत्रसंचालन प्रा. रामदास लाड यांनी केले.

### आयटी कॉलेज, नवोदय प्रवेश, वक्तृत्व स्पर्धेसाठी पारितोषिकांची घोषणा

पुढील वर्षासाठी अनेक समाजबांधवांनी स्कॉलरशिप जाहीर केल्या. यात लोहार समाजातील ज्यांचा आयटी कॉलेजमध्ये प्रवेश होईल, नवोदय विद्यालयात प्रवेश होईल, वक्तृत्व स्पर्धेसाठीही पारितोषिकांची घोषणा करण्यात आली.

# आगडगाव देवस्थानच्यावतीने भाविकांना अडीच हजार किलो आमरसाचा महाप्रसाद

नगर – तालुक्यातील आगडगाव श्रीक्षेत्र काळभैरवनाथ देवस्थानच्या वतीने २५ मे रोजी देवदर्शन करण्यासाठी येणाऱ्या भाविकांसाठी अडीच हजार किलो आंब्याच्या रसाच्या महाप्रसादाचे आयोजन केले होते.



नगर शहरापासून २० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या आगडगाव या ठिकाणी श्रीक्षेत्र काळभैरवनाथाचे पुरातन मंदिर आहे. या मंदिरामध्ये गेल्या २१ वर्षापासून प्रत्येक रविवारी आमटी भाकर व भात याचा महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. तसेच प्रत्येक वर्षी मे महिन्यामध्ये येणाऱ्या भाविकांसाठी आमरस जेवणाच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. या ही वर्षी अडीच हजार किलो आंब्याच्या रसाचे महाप्रसादाचे आयोजन मंदिराच्या वतीने करण्यात आले होते. दुपारपर्यंत दहा हजार भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.

महाप्रसाद बनवण्यासाठी मंदिराच्या आसपास जवळ असणाऱ्या आगडगाव, देवगाव, कात्रड, टोकेवाडी, रतडगाव या गावातील जवळपास दीडशे महिलांनी हा महाप्रसाद बनवला. प्रत्येक रविवारी देखील या महिला महाप्रसाद बनवण्यासाठी मदत करीत त असतात.

तसेच आमरसाबरोबर चपाती, पुरी, आमटी, भात याचा देखील महाप्रसाद मंदिराच्या वतीने देण्यात आला. जवळपास २० हजार भाविकांना पुरेल एवढा हा महाप्रसाद बनविण्यात आला, असे मंदिराचे अध्यक्ष बलभीम कराळे यांनी सांगितले.



# चटपटीत चिप्स भेळ

झटपट रेसिपी

दोस्तांनो, संध्याकाळच्या वेळी काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. अशावेळी पटकन भेळेचा पर्याय निवडला जातो. भेळ म्हटली की चुरमुरे हवेत. पण तुमच्याकडे बटाटा वेफर्सचं एखादं पाकिट असलं तरी भेळ बनवता येईल. चला तर मग, पटकन होणारी ही रेसिपी ट्राय करू या.

**सामग्री:** बटाटा वेफर्स, चिरलेला कांदा, टॉमेटो, हिरव्या मिरच्या, फरसाण, शेव, लिंबाचा रस

**कृती:** बटाटा वेफर्सचे छोटे तुकडे करा. त्यात कांदा, टोमॅटो आणि हिरव्या मिरच्या घाला. नीट मिसळून घ्या. मग फरसाण आणि शेव घालून थोडा लिंबाचा रसही घाला. सर्व घटक नीट मिक्स करा. वेफर्स, फरसाणात मीठ असतंच. तुमच्या चवीनुसार मीठ घाला. वरून कोथिंबिरही घालता येईल. संध्याकाळच्या चहासोबत ही चिप्स भेळ मस्त लागेल. इतकंच नाही तर मित्रमंडळींकडून तुमच्या कल्पकतेचं कौतुकही होईल.

# जोश

## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

# शाळा सोडून उभारला अडीचशे कोटींचा उद्योग

अचिव्हर



अजय अजमेरा हे एक मोठे उद्योगपती आहेत. त्यांची कंपनी 'अजमेरा फॅशन' कापड उद्योगात काम करते आणि त्यांची वार्षिक उलाढाल २५० कोटी रुपयांपर्यंत आहे. अजय अजमेरा यांनी स्वतःच्या बळावर इतकं मोठं व्यावसायिक साम्राज्य उभं केलं आहे. त्यांच्याकडे कोणतीही पदवी नव्हती. ते कोणत्याही अनुभवाशिवाय या उद्योगात आले आणि अल्पावधीतच मोठा व्यवसाय उभा केला.

अजय अजमेरा यांचा जन्म राजस्थानमधील एका छोट्या शहरात एका सामान्य कुटुंबात झाला. १९७३ मध्ये जन्मलेल्या अजय यांनी फक्त ११ वीपर्यंत शिक्षण घेतलं. त्यानंतर वाईट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी शिक्षण सोडलं; पण अजयची स्वप्नं मोठी होती. ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी नवीन कामाच्या संधी शोधायला सुरुवात केली आणि ते गुजरातमधील सुरत येथे पोहोचले. कोणताही अनुभव नसताना कापड उद्योगात काम करायला सुरुवात केली. सुरतला भारताचं कापड केंद्रदेखील म्हटलं जातं. अनुभवाअभावी, त्यांनी कापड उद्योगात अत्यंत खालच्या स्तरावर काम करण्यास सुरुवात केली.

कापड उद्योगातील बारकावे

अजयने कापडांची वर्गवारी करण्यापासून पुरवठा साखळीतील गुंतागुंत समजून घेण्यापर्यंत प्रत्येक विभागात काम केलं. हळूहळू त्यांना कापड उद्योगाची चांगली समज मिळाली. अजय यांना काहीतरी वेगळं आणि चांगलं करण्याचं होतं. त्यांना लहान उद्योजक आणि महिलांसाठी हा व्यवसाय सोपा करायचा होता. २० वर्षे अजय यांनी कापड उद्योगात विविध पदांवर काम करून अनुभव मिळवला. २०११ पर्यंत, अजय दरमहा २ लाख रुपये कमवू लागले; पण ते त्यावर समाधानी नव्हते. अशा परिस्थितीत अजय यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला.

कमी गुंतवणुकीत संधी

अजय यांना कापड उद्योगातील अनेक उणीवा दूर करायच्या होत्या. २०११ मध्ये त्यांनी कापड उद्योगातील उणीवा भरून काढण्यासाठी 'अजमेरा फॅशन' नावाचा स्वतःचा कापड व्यवसाय सुरू केला. कमी गुंतवणुकीत व्यवसाय सुरू करण्याची संधी लोकांना मिळावी अशी अजयची इच्छा होती. म्हणून त्यांनी २५,००० रुपयांच्या गुंतवणुकीत व्यवसाय उभारण्याची संधी उपलब्ध करून दिली. अजमेरा फॅशन लोकांना सोर्सिंग, प्रशिक्षण आणि मार्केटिंगबाबत मार्गदर्शन करतं आणि त्यांना व्यवसाय उभारणीसाठी पाठिंबा देतं.

# उन्हाळ्यातलं कलर कॉँबिनेशन

फॅशन पॅशन



आपला ड्रेसिंग सेन्स केवळ आरामदायकच नसावा तर त्यामुळे इतरांना प्रभावितही करता यावं असं प्रत्येकालाच वाटतं. उन्हाळ्यात स्वतःला कूल आणि ताजेतवाने ठेवणं हे फार कठीण नाही. पाच उत्तम रंगसंगती जाणून घेतल्या, तर त्या उन्हाळ्यात कूल आणि स्टायलिश लूक देतील.

**पांढरा आणि निळा**

उन्हाळ्यात सर्वोत्तम आणि ताजा लूक मिळवायचा असेल तर पांढऱ्या आणि निळ्या रंगाचं कॉँबिनेशन वापरा. पांढरा शर्ट आणि निळी जीन्स किंवा निळा शर्ट आणि पांढरी पँट, दोन्हीही लूक ऑफिससाठी योग्य आहेत. हे कॉँबिनेशन आरामदायी असून तुम्हाला थंड आणि ताजंतवानं ठेवतं.

**✻ पेस्टल पिवळा आणि हिरवा**

पेस्टल पिवळ्या आणि हिरव्या रंगाचं कॉँबिनेशन नवीन ऊर्जा आणि ताजेपणाची भावना देतं. हिरव्या रंगाची पँट आणि पेस्टल पिवळा शर्ट किंवा पेस्टल पिवळा स्कर्ट आणि हिरव्या रंगाचा टॉप ही दोन्ही कॉम्बिनेशन्स उत्तम आहेत. हे ऑफिसमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करते.

**✻ फिकट गुलाबी आणि पांढरा**

ऑफिसमध्ये सुंदर लूक हवा असेल तर फिकट गुलाबी आणि पांढरा रंग हे उत्तम कॉँबिनेशन असू शकतं. पांढरी पँट किंवा स्कर्ट फिकट गुलाबी रंगाचा शर्ट किंवा टॉपसह, हे कॉम्बिनेशन खूप सुंदर आणि आकर्षक लूक देतं. हे रंग तुम्हाला कूल आणि ताजंतवानं बनवतात आणि ऑफिसमध्ये एक आकर्षक प्रतिमादेखील निर्माण करतात.

**✻ नेव्ही ब्लू आणि ग्रे**

नेव्ही ब्लू आणि ग्रे रंगाचं कॉँबिनेशन व्यावसायिक आणि स्टायलिश दिसतं. नेव्ही ब्लू टॉपसह राखाडी ट्राउझर्स किंवा राखाडी ब्लू शर्ट हे एक आदर्श कॉँबिनेशन आहे. हे रंग कूल आणि आरामदायी लूक देतात. उन्हाळ्याच्या हंगामात ते ऑफिससाठी योग्य आहे. हा लूक तुमच्या सहकाऱ्यांनाही तुमच्याकडे आकर्षित करेल.

**✻ ऑलिव्ह ग्रीन आणि बेज रंग**

ऑलिव्ह ग्रीन आणि बेज रंगाचं कॉँबिनेशन एक सोबर आणि स्टायलिश लूक देतं. ऑफिसमध्ये बेज रंगाच्या ट्राउझर्ससह ऑलिव्ह ग्रीन शर्ट किंवा बेज रंगाच्या पॅन्टसह ऑलिव्ह ग्रीन जॅकेट हे दोन्ही लूक उन्हाळ्यासाठी आदर्श आहेत.

# दीर्घकाळ स्मरणात राहण्यासाठी..

स्टडी टिप्स

मुलांसाठी परीक्षेची तयारी करणं हे सर्वात कठीण काम असतं. कमी वेळात इतक्या गोष्टी लक्षात ठेवणं कठीण होतं. या टिप्स वापरून अभ्यास केल्यास परीक्षेत चांगले गुण मिळू शकतात



**✻ नोट्स काढा**

कॉलेजमध्ये शिकवल्या जाणाऱ्या विषयांच्या नोट्स बनवा. त्या शेवटी वाचायला सोप्या वाटतील. कोणत्याही विषयाच्या पुस्तकी भाषेत नोट्स बनवू नका. शिक्षक बोलतात तेच वहीत लिहा. वहीतील रेखाचित्रांद्वारे गोष्टी लहान स्वरूपात तयार करा. जेव्हा तुम्ही परीक्षेत ते पुन्हा कराल, तेव्हा तुम्हाला समजण्यास कोणतीही अडचण येणार नाही. याशिवाय, विषयांमधील संबंध समजून घेण्याचा प्रयत्न करा. असे केल्याने तुम्हाला एकाच वेळी एकच नाही तर अनेक विषय आठवतील.

**✻ फ्लॅशकार्ड तयार करा**

महत्त्वाच्या विषयांचे फ्लॅशकार्ड तयार करा आणि ते पुस्तकात चिकटवा. यामुळे परीक्षेदरम्यान गोष्टी लक्षात ठेवण्यात अडचण येणार नाही. शिवाय पुस्तकांमध्ये हायलाईटर वापरा. सराव चाचण्या द्यायला सुरूवात करा. सराव चाचण्या दिल्याने केलेला अभ्यास लक्षात राहण्यास मदत होईल. वारंवार चाचण्या दिल्याने चांगला सराव होतो. ५ विषय असतील तर दररोज २-३ विषयांच्या चाचण्या द्या. जुन्या प्रश्नपत्रिका सोडवून तयारी करा. दृश्य साधनांचा वापर केल्यास विषय लक्षात ठेवण्यास मदत होईल. त्यामुळे विषयांबद्दलच्या आकलनाचं मूल्यांकन करण्यातही मदत होईल. विषयांच्या एमसीक्यू प्रश्नांची उत्तरे दिल्यास चांगली रिव्हिजन होईल.

## स्मार्ट टिप

### फोन हँग होतो?




अनेकदा फोन हळू चालत राहून हँग होत असल्याने त्याचा त्रास होतो; पण ही समस्या अगदी सहजपणे टाळता येते. तेही फक्त फोन रीस्टार्ट करून. स्मार्टफोन रीस्टार्ट करणं हा अतार्किक उपाय वाटू शकतो; परंतु तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार रिस्टार्ट करणं डिव्हाइसची कार्यक्षमता राखण्यात मोठी भूमिका बजावतं. आठवड्यातून एकदा स्मार्टफोन रीस्टार्ट केल्याने अनेक फायदे होतात. फोन सुरळीत चालण्यासाठी आठवड्यातून किमान तीन वेळा रीस्टार्ट करावा, असं तज्ज्ञांना वाटतं. मोबाईल कम्युनिकेशन कंपनी टी-मोबाइलच्या मते, आयफोन आणि अँड्रॉइड स्मार्टफोन आठवड्यातून किमान एकदा तरी रीस्टार्ट करावेत. सॅमसंगच्या मते त्यांचे गॅलेक्सी फोन दररोज रीस्टार्ट करावेत.

## टेक टॉक

### एसीचा कॉम्प्रेसर कुठे ठेवाल?



एसीचा कॉम्प्रेसर हवेशीर ठिकाणी ठेवावा. कॉम्प्रेसर थंड होण्यासाठी त्याच्याभोवती हवेचा प्रवाह राखणं महत्त्वाचं असतं. कॉम्प्रेसर युनिट चुकीच्या ठिकाणी ठेवल्यास त्याला थंड हवा मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत एसी कॉम्प्रेसर जास्त गरम झाल्यामुळे खराब होऊ शकतो किंवा त्याला आगदेखील लागू शकते. एसी कॉम्प्रेसर युनिट ठेवण्यासाठी टेरेस आणि बाल्कनी दोन्ही आदर्श ठिकाणं आहेत. बाल्कनीत बराच काळ सावली असेल तर बाल्कनी ही कॉम्प्रेसर ठेवण्यासाठी सर्वोत्तम जागा असेल. घरात बाल्कनी नसेल तर कॉम्प्रेसर टेरेसवरदेखील ठेवता येतो.

## ॲप वर्ल्ड

### 'टिकटॉक'चं नवं फीचर



'टिकटॉक'ने 'एआय अलाइव्ह' नावाचं एक नवीन 'आर्टिफिशियल इंटेलिजेंस' (एआय) फीचर लॉंच केलं आहे. हे टूल कोणत्याही इमेजला ॲनिमेटेड व्हिडीओमध्ये रूपांतरित करू शकतं. सध्या हे फीचर फक्त टिकटॉक स्टोरीजमध्ये वापरलं जाऊ शकतं, थेट टिकटॉक फीडमध्ये नाही. एका प्रमुख व्हिडीओ 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झालेलं कोणत्याही फोटोला लघु व्हिडीओमध्ये रूपांतरित करणारं हे पहिले 'एआय' टूल आहे. इंस्टाग्राम, एक्स (ट्विटर) आणि स्नॅपचॅट सारखे प्लॅटफॉर्म्सवर अद्याप अशा प्रकारचं एआय व्हिडीओ जनरेशन तंत्रज्ञान उपलब्ध नाही. हे फीचर वापरण्यासाठी 'टिकटॉक ॲप'वर जा आणि इनबॉक्स पेज किंवा प्रोफाइल पेजच्या वरच्या बाजूला असलेल्या निळ्या आयकॉनवर टॅप करा. तुमच्या स्टोरी अल्बममधून एक इमेज निवडा. फोटो एडिट पेजच्या उजव्या बाजूला असलेल्या टूलबारमध्ये तुम्हाला 'अलाईव्ह' आयकॉन दिसेल (दुसरा). त्या आयकॉनवर टॅप करा आणि दिसणाऱ्या विंडोमध्ये एक मजकूर प्रॉम्प्ट एंटर करा. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही तिथे सुचवलेल्या सूचनांपैकी एक निवडू शकता. नंतर जनरेट बटनावर टॅप करा आणि काही क्षणातच एक छोटा व्हिडीओ तयार होईल. तुम्ही तयार केलेला व्हिडीओ तुमच्या स्टोरीमध्ये पोस्ट करू शकता. हा व्हिडिओ तुमच्या फॉलोइंग फीड आणि तुमच्या प्रोफाइल पेजवर पाहता येईल.



# फायदे सायकलिंगचे

फिटनेस फंडा

मित्रमंडळींसोबत सायकलिंगचा आनंद घेताना खूप धमाल येते. भटकंतीला गेल्यावर आपण सायकलिंग करतो. पण दोस्तांनो, नियमित सायकलिंग करायला हवं. याचे अनेक लाभ आहेत. फिटनेसच्या दृष्टीने सायकलिंग कसं उपयुक्त ठरतं याविषयी...

✻ सायकलिंगमुळे फक्त पायांना व्यायाम मिळतो असं नाही. तर हा एक परिपूर्ण व्यायाम आहे. सायकलिंगमुळे शरीर बळकट होतं.

✻ सायकलिंगमुळे मासनिक आरोग्य उत्तम रहातं. ताण कमी होतो. मित्रमंडळींसोबत छान गप्पा मारत सायकलिंग केल्यावर मन प्रफुल्लित होतं. काही बागांमध्ये सायकल ट्रॅक्स असतात. निसर्गाच्या सानिध्यातही खूप छान वाटतं.

✻ सायकलिंगमुळे झटपट वजन कमी होतं. यामुळे प्रत्येक अंगाचा व्यायाम होत असल्याने अतिरिक्त फॅट्स जाळायला मदत होते.

✻ सायकलिंग हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम मानलं जातं. यामुळे श्वसनाचं तंत्र सुधारतं. आपला स्ट्रॅमिना वाढतो. त्यामुळे दररोज किमान अर्धा तास सायकल चालवायला हवी.

# छंदाला व्यावसायिकतेची जोड

वेगळ्या वाटा

बऱ्याच तरुणांना नोकरीऐवजी उद्योग करायचा असतो. काहींना फोटो काढण्याचा छंद असतो. काही गायन, वादनात पुढे असतात. काहींची चित्रकला, शिल्पकला चांगली असते. तुम्ही तुमच्या या छंदाचंच व्यवसायात रुपांतर करू शकता. छंदांच्या माध्यमातून उद्योगाचं गणित जुळवणारी अनेक मंडळी आपल्या आसपास आहेत. छंदांना व्यवसायाचं रुप देण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

✻ सर्वात आधी तुमच्या छंदांची यादी करा. तुम्ही नेमके कशात कुशल आहात याचा अंदाज घ्या. तुमचा हा छंद चांगलं उत्पादन किंवा सेवा म्हणून कशाप्रकारे सादर करता येईल याचा विचार करा.



✻ यादी केल्यानंतर बाजारपेठेबाबत थोडं संशोधन करा. यामुळे तुम्हाला भावी ग्राहक, त्यांच्या आवडीनिवडी याबद्दल कळू शकेल. त्यांच्यापर्यंत कसं पोहोचायचं हे तुम्ही ठरवू शकाल.

✻ उत्पादन किंवा सेवा बाजारात उतरवण्याआधी आपली कल्पना तपासून घ्या. काही ग्राहकांना उत्पादनाची माहिती द्या. तुमची उत्पादनं किंवा सेवा त्यांना वापरायला द्या. त्यांच्याकडून सूचना मागवा. उत्पादनांमध्ये काही सुधारणा करायच्या असतील तर तसा विचार करा.

✻ यानंतर तुमच्या उत्पादनाला किंवा सेवेला नाव द्या. मार्केटिंगचं तंत्र जुळवा. लवकरात लवकर उत्पादन बाजारात आणा.

# उशाखाली मोबाईल ठेवणे धोकादायक

टेक्नोहेल्थ



जागतिक आरोग्य संघटना आणि इतर मोठ्या संस्थांना मोबाईल फोनच्या रेडिएशनमुळे मेंदूला थेट गंभीर नुकसान होत असल्याचा कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे, मोबाईल जवळ ठेवून झोपण्यामुळं रेडिएशनचा धोका नसला, तरी अन्य धोके दुर्लक्षून चालणार नाहीत. सध्या बहुतांश लोक झोपतानादेखील मोबाईल उशाशी ठेवतात; पण ही सवय आरोग्यासाठी घातक ठरू शकते. मोबाइलमधून निघणाऱ्या रेडिएशनचा आपल्या मेंदूवर आणि झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.

**मोबाईल जवळ ठेवून झोपल्याने काय होतं?**

✻ सतत नोटिफिकेशन्स, वायब्रेशन किंवा लाईटमुळे मेंदू सतत ॲक्टिव्ह राहत असल्याने झोप पूर्ण होत नाही.

✻ मोबाइल फोनमधून निघणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशनमुळे मेंदूवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

✻ झोपण्याआधी मोबाईल स्क्रीनकडे पाहिल्याने 'ब्लू लाइट' डोळ्यांवर ताण आणतो आणि झोपेच्या नैसर्गिक चक्रात अडथळा निर्माण होतो.

✻ झोपेच्या कमतरतेमुळे चिडचिड, डिप्रेशन, चिंता यासारख्या मानसिक त्रासांची शक्यता वाढते.

✻ काही घटनांमध्ये मोबाईल गरम होऊन स्फोट झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. त्यामुळे चार्जिंगवर असलेला मोबाईल उशाशी ठेवणं धोकादायक ठरू शकतं.

**काय काळजी घ्याल?**

रेडिएशनचा मोठा बागुलबुवा खरा नसला तरी, शांत आणि सुरक्षित झोपेसाठी काही गोष्टी लक्षात ठेवणं गरजेचं आहे. शक्य असल्यास, रात्री झोपताना मोबाईल तुमच्यापासून थोडा दूर ठेवा. तो उशाखाली किंवा कोणत्याही कापडाखाली, विशेषतः चार्जिंगला असताना, अजिबात ठेवू नका. झोपण्यापूर्वी काही वेळ मोबाईल न बघितल्यास शांत झोप लागण्यासही मदत होते.





वालुंबा नदीला आलेल्या पुरामुळे अकोळनेर–सारोळा रस्त्यावरील पाण्याखाली गेलेला पुल. दुसऱ्या छायाचित्रात पूर्वा नदीला आलेल्या पुरामुळे सारोळा–घोसपुरी रस्त्यावरील पाण्याखाली गेलेला पूल तर तिसऱ्या छायाचित्रात खडकी येथे दोन्ही नद्यांच्या संगमानंतर दौण्ड रोडवरील पुलाला लागलेले पाणी.

# अहिल्यानगर जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जारी

नगर – जिल्ह्यात २६ ते २८ मे दरम्यान वीजांच्या कडकडाटासह वादळी वारा व मुसळधार पाऊस होण्याचा शक्यता भारतीय हवामान खात्यामार्फत वर्तवण्यात आली आहे. जिल्ह्यासाठी यलोअलर्टही जारी करण्यात आला असुन नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

पुणे जिल्ह्यात भिमा नदीच्या मुक्त पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे भिमा नदीस दौंड पुल येथे १९ हजार ५५ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. भिमा नदीकाठावरील श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नदीकाठावरील गावांनी स्थानिक प्रशासनाद्वारे देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज्) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी (Selfie) काढू नये. नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे. पाणी पातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रापासून तसेच ओढे व नाले यापासून दूर रहावे. सुरक्षितस्थळी स्थलांतर करावे. नदी अथवा ओढे–नाल्यांवरील पुलावरून पाणी वाहत असल्यास पूल ओलांडू नये. जुनाट मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीमध्ये आश्रय घेऊ नये.

अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी दक्षता घ्यावी व वेळीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. घाटरस्त्याने शक्यतो प्रवास करणे टाळावे.

शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. वादळी वारे, वीज, पाऊस आणि गारपीट यांपासून स्वत:सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथील दूरध्वनी क्र. १०७७ (टोल फ्री), ०२४१– २३२३८४४ अथवा २३५६९४० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्र.अपर जिल्हादंडाधिकारी अरुण उंडे यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २८ मे ते १० जुन रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर महापालिका प्रशासनाच्या ओढे–नाले सफाई कामाचे 'पितळ उघडे'



सीना नदीवरील वारुळाचा मारुती रस्त्यावरील पूल परिसरातील आलेल्या पुराची व नाले सफाईची पाहणी करताना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, समवेत माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, प्रकाश भागानगरे, दीपक खेडकर, जॉय लोखंडे, राहुल कातोरे, गिरीश जगताप आदी. (छाया – लहू दळवी)

## गलथान कारभाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी : राष्ट्रवादी काँग्रेसचे संपत बारस्कर यांची मागणी

नगर – महानगरपालिकेचा नियोजनशून्य कारभारामुळे नगरकर विविध समस्यांना सामोरे जात आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील ओढे नाल्यांची सफाई होणे गरजेचे होते. मात्र कुठलेही नियोजन न करता पावसाळा सुरू झाला आणि त्यानंतर महापालिकेने सफाई चे काम हाती घेतले याचा अर्थ वराती–मागून घोडे पाहायला मिळत आहेत. वारुळाचा मारुती रस्त्यावरील पुलाजवळ कुठलीही साफसफाई न झाल्यामुळे सीना नदीला आलेल्या पुराचे पाणी आडले गेले. त्यामुळे परिसरामध्ये सर्व दूर पाणी पसरलेले चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे महापालिकेच्या नाले सफाई कामाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी केली आहे.

सीना नदीवरील वारुळाचा मारुती रस्त्यावरील पूल परिसरातील आलेल्या पुराची व त्यानंतर महापालिकेने सुरु केलेल्या नाले सफाईची पाहणी संपत बारस्कर यांनी केली. यावेळी माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, प्रकाश भागानगरे, दीपक खेडकर, जॉय लोखंडे, राहुल कातोरे, गिरीश जगताप आदी उपस्थित होते.

यावेळी बारस्कर म्हणाले, या ठिकाणी पुलाचे दरवाजे चिखल, झाडे–झुडपे यांच्यामुळे बंद झाले असल्यामुळे पुलावरून पुराचे पाणी वाहत असल्यामुळे वाहतूक बंद झाली, काही नागरिक या पाण्यातून आपला जीव मुठीत धरून प्रवास करत होते. या ठिकाणी एखादी दुर्देवी घटना घडल्याची वाट महापालिका पाहत होती का? महापालिकेने केलेल्या नालेसफाईचा दावा फोल ठरला असल्याचे ते म्हणाले.

शहरामध्ये अतिवृष्टी सुरु असून या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाने कुठल्याही उपयोजना केलेल्या दिसत नाही. आज आम्ही आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली काम करीत असून वारुळाचा मारुती रस्त्यावरील पुल परिसराची पाहणी केली असता महापालिका कारभाराचे पितळ उघडे पडले आहे. या समस्यांचा त्रास शहरातील नागरिकांना भोगावे लागत आहे, प्रशासनाला कुठलेही गंभीर्य दिसत नाही! या पूर परिस्थितीमध्ये महापालिकेचा कुठलाही जबाबदार अधिकारी रस्त्यावर दिसत नाही. शासनाकडून अतिवृष्टीचे निर्देश असताना देखील यांना सरकारच्या आदेशाचे काही देणे घेणे नाही, महापालिका प्रशासनातील अधिकारी अक्षरशा गेंड्याच्या कातड्याचे झालेले आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या अधिकाऱ्यांना सरळ करण्याचे काम केले जाईल. या अतिवृष्टीमुळे शहरातील नागरिकांचे आर्थिक नुकसान झाल्यास महापालिकेकडून भरपाई करून दिले जाईल या गलथान कारभाराचा जाब आयुक्त यांना विचारला जाईल असा इशारा माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर यांनी दिला.

# बकरी ईदच्या दिवशी गोवंश हत्या टाळण्यासाठी राज्यभरात ३ ते ८ जून या काळात जनावरांचे बाजार बंद ठेवण्याचे आदेश

नगर – बकरी ईदच्या दिवशी होणारी गोवंश हत्या टाळण्यासाठी राज्यभरात ३ ते ८ जून या काळात जनावरांचे बाजार बंद ठेवण्याचे आदेश राज्य गोसेवा आयोगाने दिले आहेत. याबाबतची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या सभापतींवर सोपवण्यात आली आहे.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्षांनी २७ मे रोजी सदर आदेशाचे परिपत्रक जारी केले आहे. यामध्ये म्हटले आहे की, सन २०२५–२६ या वर्षात ७ जून रोजी बकरी ईद हा सण राज्यात साजरा होणार आहे. या सणासाठी मोठ्या प्रमाणावर जनावरांची कत्तल/ कुर्बानी करण्यात येते. महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम १९९५ सुधारणा दिनांक– ४ मार्च २०१५ पासून राज्यात संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आला आहे. सदर सुधारित अधिनियमाप्रमाणे गोवंशाची कत्तल करण्यास मनाई आहे. तसेच या अधिनियमातील कलम ५ अ अन्वये गोवंशाची कत्तल, कत्तलीसाठी वाहतुक, कत्तलीसाठी निर्यात, कत्तलीसाठी खरेदी–विक्री, कत्तलीकरिता विल्हेवाट, गोवंशाचे मांस ताब्यात ठेवण्यास व राज्याबाहेर कत्तल केलेल्या गोवंशाचे मांस ताब्यात ठेवण्यास सक्त मनाई आहे.

त्याअनुषंगाने बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर नजीकच्या आठवड्यात ३ ते ८ जून या कालावधीत आपल्या जिल्ह्यातील विविध गावांमध्ये गुरांचा बाजार भरणार नाही याची दक्षता घ्यावी जेणेकरून गोवंशाची कत्तल होवून वरील अधिनियमांचे उल्लंघन होणार नाही याबाबत सतर्क राहावे, असे आदेश महाराष्ट्र गोसेवा आयोगाने दिले आहेत.

## १६ जुन रोजी विभागीय पोस्टल पेन्शन अदालत

नगर – पोस्टाच्या पेन्शनविषयक तक्रारीच्या निवारणासाठी १६ जुन रोजी दुपारी १२ वाजता वरिष्ठ अधीक्षक डाकघर, प्रधान डाकघर, अहिल्यानगर येथे विभागीय पोस्टल पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधितांनी लेखी अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे दोन प्रतीमध्ये ९ जुन पर्यंत वरिष्ठ अधीक्षक डाकघर, प्रधान डाकघर इमारत, दुसरा मजला, अहिल्यानगर येथे पाठवावीत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा पेन्शन अदालतीमध्ये विचार केला जाणार नाही. तक्रारदारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल, असेही कळविण्यात आले आहे.

## झेंडीगेट येथे कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या गोवंशीय जनावरांची सुटका

नगर – कत्तल करण्याच्या उद्देशाने टेम्पोमध्ये दाटीवाटीने बांधलेल्या गोवंशीय जनावरांची कोतवाली पोलिसांनी सुटका केली. ही कारवाई झेंडीगेट येथील कारी मस्जिद शेजारी २६ मे रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

झेंडीगेट येथील कारी मस्जिद शेजारी एका टेम्पोमध्ये ४ जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधून ठेवलेले आहे. अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी जाऊन खात्री केली असता एक टेम्पो (क्र. एम एच १४ ए एस ६१५५) उभा असलेल्या दिसला. पोलीस टेम्पोकडे जात असतानाच टेम्पो चालक येथून पसार झाला. पोलिसांनी टेम्पोची पाहणी केली असता त्यात चार गोवंशीय जनावरे दाटीवाटीने बांधून त्यांच्यासमोर कोणताही चारा खाद्य, पाणी न ठेवलेल्या अवस्थेत दिसून आले. पोलिसांनी ४५ हजार रुपये किमतीचे एक गोवंशीय जातीची गाय, १५ हजार रुपये किमतीचे ३ गोवंशीय जातीची वासरे आणि ४ लाख ३० हजार रुपये किमतीचा टेम्पो असा ४ लाख ९० हजार रुपये किमतीसाठी मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पोलिस अंमलदार शिरीष तरटे यांनी दिलेल्या फिर्यादीवर अज्ञात टेम्पो चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २७१ सह महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९७६ चे कलम ५ (क) ९ (अ) तसेच प्राण्यांना कृतीने वागवण्यास प्रतिबंध करणे बाबत अधिनियम १९६० चे कलम ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'येताय ना बाप्पा' एकांकिकेने मिळवली प्रेक्षकांची दाद



.....'येताय ना बाप्पा...' ही नाटिका सादर करताना.. उदय वैद्य, पोपटराव धामणी, बाळासाहेब देशमुख.

नगर – येथील कांकरिया मानकन्हैय्या ट्रस्ट द्वारा नुकतेच ज्येष्ठ नागरिकांसाठी नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सावेडी येथील रावसाहेब पटवर्धन सभागृहात या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. एकूण ८ संघानी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेत अहिल्यानगरच्या 'आमचे आम्हीच' या नाट्य संस्थेने सादर केलेल्या 'येताय ना बाप्पा' या एकांकिकेने रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळवली. उत्सव साजरे करताना निसर्गाचे रक्षण आणि संवर्धन ही काळाची गरज आहे हा संदेश नाटिकेतून देण्यात आला.

या एकांकिकेला उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक मिळाले. यामध्ये पोपट धामणे, बाळासाहेब देशमुख आणि उदय वैद्य यांनी प्रमुख भूमिका साकारल्या. नाट्यसंहितेचे लेखन चंद्रशेखर जोशी यांचे होते तर विशाख वैद्य यांनी वेशभूषा व संगीताची बाजू सांभाळली.

बक्षीस वितरणावेळी व्यासपीठावर डॉ.सुधा कांकरिया, डॉ. प्रकाश कांकरिया, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलुलकर, कवी चंद्रकांत पालवे आदी होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशीलांबरोबर ठरलेला असुन, खाली नमुद केलेल्या विद्यमान मालकांनी आमचे अशील यांची खात्री व भरवसा देऊन कायमखुश खरेदी देणेचे ठरविले असुन विसारापोटी मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणुन या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद चालु असल्यास अथवा दान, बक्षीसपत्र, अव्वलजप्ती, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, लीन, इजमेंट, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार वगैरे असल्यास संबंधतांनी आपल्या हरकती, तक्रारी वगैरे लेखी स्वरुपात, ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन **सात (०७)** दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष आणुन दाखवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलांसह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन दयावी. सदर मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अथवा लेखी तक्रार न आल्यास, तसेच ज्याचे सदर मिळकतीबाबत काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी सदरचे हक्क, हितसंबंध जाणीव पुर्वक सोडुन दिले आहेत असे समजुन आमचे अशील वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. तारिख २७/०५/२०२५

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :- डि।। अहिल्यानगर सब डि।। ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील सर्व्हे नंबर २१३/२+२०६/१ब/१अ + २०६/१ब/२/१ मधील प्लॉट नं. ४४ (संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नंबर २१३/२/२०६/१ब / १अ /२/१/प्लॉट ४४ चे क्षेत्र १६८.७५ चौ. मी. बांधकामाचे क्षेत्र ११५.०५ चौ.मी. व त्यामधील लाईट मिटर, नळ कनेक्शनसह मिळकत** यासी चतु:सिमा पुर्वेस : सर्व्हे नंबर पैकी, दक्षिणेस : प्लॉट नं. ४५, पश्चिमेस : ९ मीटर रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ४३.

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत त्यामधील तदंगभूत वस्तुंसह जाणेयेणेचे हक्कासह काही एक राखुन न ठेवता मिळकत.

**उपरोक्त मिळकतीचे विद्यमान मालक**
**जितेंद्र अशोकराव वल्लाकटी**
रा. प्लॉट नं. ४४/२०६, अंकुर सोसायटी,
धर्माधिकारी मळा, वासुदेव नगर, अहिल्यानगर

**ॲड. रजनी यशवंत गायकवाड नोटरी पब्लिक (भारत सरकार)**
**ॲड. मनोज यशवंत गायकवाड नोटरी पब्लिक (भारत सरकार)**
कार्यालय पत्ता :– बन्सी महाराज मिठाई समोर, कलानगर, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर – ४१४००३.मो. नं. ९८९०००९०८८, ९८९०५८२८२५


# लाठी काठीचे प्रशिक्षण कायमस्वरूपी मिळण्यासाठी चांगले प्रशिक्षक तयार करा

## नरेंद्र फिरोदिया यांचे आवाहन; सकल राजस्थानी व गुजराती समाज आयोजीत प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद




सकल राजस्थानी व गुजराती समाजाच्यावतीने आयोजित लाठी काठी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया.

नगर – एकमेकांना कधीच त्रास होणार नाही अशी समाज निर्मिती होण्याची गरज आहे. पण सध्या परिस्थिती खूप बिघडत चालली आहे. प्रत्येकाने स्व व कुटुंबाच्या संरक्षणासाठी सक्षम होणे आवश्यक आहे. यासाठी लाठी काठीचे प्रशिक्षण उत्तम पर्याय आहे. अहिल्यानगर मधील जास्तीत जास्त नागरिक, युवक, युवती व बालकांनी अशा शिबिरात सहभागी होणे गरजेचे आहे. पुढील काळात शहरात लाठी काठीचे प्रशिक्षण कायम स्वरूपी मिळावे यासाठी चांगले प्रशिक्षक तयार करा. प्रत्येक शाळेतून विद्यार्थ्यांना याचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे. यासाठी प्रशिक्षक तयार होण्यासाठी पुढकार घ्यावा, असे आवाहन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

अहिल्यानगरमधील सकल राजस्थानी व गुजराती समाजाच्यावतीने शहरातील सर्वांसाठी आयोजित लाठी काठी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन केशर गुलाब मंगल कार्यालयात उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. यावेळी प्रमुख पाहुणे भारत भारतीच्या राष्ट्रीय सचिव साधना राव, प्रदेश सचिव डॉ.धर्मेंद्र राजवद, उद्योजक जितेंद्र बिहाणी, मेघना मुनोत आदींसह आयोजक संस्थांचे पदाधिकारी व सहभागी प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जितेंद्र बिहाणी म्हणाले, समर्थ रामदास स्वामी यांनी सांगितल्याप्रमाणे अति नम्रता नसावी. पण जैन, राजस्थानी, गुजराथी समाजाच्या अति नम्र स्वभावामुळे हा समाज प्रतिकार करत नाही असा समज झाला आहे. ही परिस्थिती बदलणे गरजेची असून लाठी काठी प्रशिक्षणातून हे प्रत्यक्षात येईल. कमलेश भंडारी यांनी यासाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. अशा उपक्रमांना कायम सहकार्य करू.

मेघना मुनोत म्हणाल्या, मुली महिलांप्रती समाजाने आदर बाळगावा. तरुणांमधील विकृती नष्ट होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन करून लाठी काठी प्रशिक्षण उपक्रमाचे कौतुक केले.

प्रास्ताविकात कमलेश भंडारी म्हणाले, पहेलगामसारख्या आपत्कालीन घटनांमध्ये कुटुंबासह स्व संरक्षण करता येणे गरजेचे आहे. यासाठी नव्या पिढीला सक्षम करण्यासाठी या लाठी काठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिरासाठी सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या बऱ्याच संघटना एकत्र आल्या असून अनेकांनी बहुमोल सहकार्य केले. या सुटीत लाठी काठीचे प्रशिक्षण शिबिराचे घेतले आहे. दिवाळीच्या सुटीत तलवार व दानपट्टा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करणार आहे.

या प्रशिक्षण शिबिरात सुमारे ३०० हून अधिक नागरिक, महिला व लहान मुलांनी सहभाग घेतला आहे. सर्वांना पुणे येथील श्री शिवाजीराजे मर्दानी आखाड्याचे विजय आचवले व तज्ज्ञ प्रशिक्षक शास्त्रोक्त प्रशिक्षण देत आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनेश कोठारी यांनी केले. शाम भुतडा यांनी आभार मानले.

यावेळी राकेश भंडारी, प्रतिक बाबेल, मधु भंडारी, आनंद मुथा, संदेश मुनोत, अमित कबर, रुपेश पारख, हर्षल बोरा, पवन गुंदेचा, भारत भारतीचे रमेश रासने, हरिष हरवानी, चंद्रकांत पंडित, समीर बोरा, मनीष सोमाणी, सचिन भंडारी, सचिन डुंगरवाल, सत्येन गुंदेचा, प्रवीण शिंगवी व प्रमोद गांधी आदींसह अहिल्यानगर शहरातील जैन ओसवाल युवक संघ, बडीसाजन ओसवाल युवक संघ, माहेश्वरी युवक मंडळ, सकल राजस्थानी युवा मंच, जय आनंद महावीर युवक मंडळ, जय आनंद फाउंडेशन, दालमंडई, श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्ट, जितो अहिल्यानगर, जिंगर युवा मंच, वर्धमान युवक संघ, समस्त गुजराथी समाज, भारत भारती, जिजाऊ ग्रुप व वंदे मातरम युवा प्रतिष्ठान आदी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सेल्सगर्ल पाहिजे जागा : २

झोपडी कॅन्टीन परिसरात सावेडी एरियामध्ये कापड दुकानातील शोरूमकरिता सेल्सगर्ल पाहिजे.

**9518390392**

## त्वरित कामगार पाहिजेत

लॉजिंग कामासाठी मुले/कामगार पाहिजेत
* दिवसा : ४ जागा
* रात्री : ४ जागा
(भरपूर पगार)

**7083493300**

## पाहिजेत

जिओ इंटरनेट इन्स्टॉलेशनकरिता मुले पाहिजेत

पगार- २०००० ते २५०००
स्वताःची गाडी असणे आवश्यक
शैक्षणिक पात्रता-१० वी ते १२ वी

**9960631097**

## विकणे आहे

कमर्शियल बिल्डींगमध्ये ऑफिस देणे आहे.
कार्पेट एरिया : ८३५ स्क्वे.फू.
एचडीएफसी बँकेशेजारी पाईपलाईनरोड,सावेडी,अ.नगर

**7768895999**

## फ्लॅट भाड्याने देणे

पाईपलाईन रस्त्यावरील मोरया मंगल कार्यालयामागे असलेल्या सहकारनगर येथील गोपाल कॉम्पेक्समधील पहिल्या मजल्यावरील 2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
- संपर्क -

**7972996235**

## बंगला विकणे आहे

सर्व सोई युक्त, २ गुंठे प्लॉट व १६०० sq/ft बांधकाम.
शाहूनगर,केडगाव, अहिल्यानगर

**9890601509**

## गोडावूनसाठी साडेचार एकर जागा भाड्याने देणे आहे.

कल्याणरोड व आयुर्वेद चौकापासून २-३ मिनिटाच्या अंतरावर

**9271718081**

## शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी

केमिकल फिनाईल व जनरल स्टोअर्सचे चालू स्थितीतील दुकान चालविण्यास देणे

**7820920066**

## पाहिजेत

होलसेल मेडिकलसाठी मुले - जागा ६
फुलटाईम/पार्टटाईम

**9422222217**

## पाहिजेत

सिक्युरिटी गार्ड– (पुरुष)
स्टार २४ सिक्युरिटी सर्व्हिसेस्

**8788365654**
**8378951787**

## पाहिजेत

शैक्षणिक अकॅडमी साठी कॉम्प्युटर चे ज्ञान असलेले Graduate रिसेप्शनिस्ट पाहिजे

**7276689011**

## देणे आहे

सेमी ऑटोमॅटिक आईस्क्रीम पार्लर देणे आहे. सर्व मशीन व आकर्षक इंटेरियरसह आहे त्या स्थितीत आहे तिथेच देणे आहे.
-पत्ता-
संत छाया अपार्टमेंट कोहिनूर मंगल कार्यालयसमोर गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर

**9890021541**

## गाळा भाड्याने देणे

जुने सिव्हील हॉस्पिटल समोर, गुरुनानक मार्केट येथे ३०० स्क्वे. फुट रोडटच गाळा भाड्याने देणे

**7507512122**

## घर भाड्याने देणे आहे

रासनेनगर चौकामधील 1BHK रौ-हॉऊस भाडयाने देणे आहे

संपर्क -8600009777

## फ्लॅट भाड्याने देणे

७५० स्क्वे. फुट व्यवसायसाठी/ऑफिससाठी ग्राऊंड फ्लोअर, सिटीच्या मध्यावर्ती सबजेल चौक, अहिल्यानगर

**9960988860**

## महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल

स्वस्त म्हणजे नक्की काय असतें..?



### रेनकोट आणि छत्री महोत्सव

पावसाळा सुरु होण्या पूर्वी पावसाळ्याची तयारी करूया

झील आणि वर्षा रेनकोटवर सरसकट 20% डिस्काउंट

१० जून पर्यंत रेनकोट खरेदी करा आणि अधिकचा डिस्काउंट मिळवा..

सर्व फ्रेश स्टॉक, नवीन डिझाईन रेडी स्टॉकमध्ये उपलब्ध

* सर्व शालेय मुलांचे सॅक वाले रेनकोट मिळतील.
* लेडीज रेनकोट मिळतील.

अधिक माहितीसाठी भेट द्या.. **श्री महावीर कलेक्शन**

मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

## अर्जंट पाहिजेत

ड्रायव्हर 4 जागा
टुरिस्ट कारसाठी
टी आर लायसन्स सहीत, शहरातील असल्यास प्राधान्य
मीरा सर्विस, मार्केट यार्ड, अ.नगर

**9595956881**
**8007207874**

## टेली कॉलिंगसाठी मुली पाहिजे

लक्ष्मी सर्विसेस शाखा- भिंगार, केडगाव,सावेडी

**9890924812**

## युनिफॉर्म दुकानात पाहिजेत

सेल्समन - 10
सेल्स गर्ल / महिला कामगार - 10
अनुभवींना प्राधान्य.
अर्जासह सकाळी ११ ते ७ या वेळेत समक्ष भेटा.

**बेस्ट युनिफॉर्मस**
बेसमेंट, कैलास डेअरी, खिस्त गल्ली जवळ, चर्च रोड, अहिल्यानगर

## पाहिजेत

फ्लेक्स प्रिंटिंग ऑफिसमध्ये कामासाठी मुलगा पाहिजे.
• मशिन ऑपरेटर (जागा-4)
कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान आवश्यक.
नमोह प्रिंटर्स
जुना बाजार, बॉम्बे बेकरी समोर, अहिल्यानगर
संपर्क-९४२३१७८३७५

---

सोसायटी रजि. (१९८९-९०) रजि. नं. महा /१९८७/अहिल्यानगर
एफ नं. १७१५ अहिल्यानगर

## श्री बाणेश्वर शिक्षण संस्था

बुऱ्हाणनगर (एकनाथनगर), ता.जि.अहिल्यानगर.
फोन : (०२४१) २३२५९५५

**जाहीर निविदा** दिनांक : २६/०५/२०२५

श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेमधील सर्व युनिट साठी शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ करिता लागणारे साहित्य मागणीसाठी नावलौकिक प्राप्त अधिकृत पुरवठादारांकडून/ठेकेदारांकडून/दुकानदारांकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**साहित्याचा प्रकार :-**

१) सर्व प्रकारची स्टेशनरी
२) सर्व प्रकारची छपाई
३) प्रयोगशाळा साहित्य, उपकरणे, केमिकल खरेदी
४) संगणक व संगणकीय उपकरणे, खरेदी व दुरुस्ती
५) क्रीडा साहित्य खरेदी

उपरोक्त कामाचे विहित निविदा फॉर्म व सर्व प्रकारचे साहित्य यादी www.baneshwarcollege.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

सदर निविदा फॉर्म दि. २६/०५/२०२५ ते ०२/०६/२०२५ रोजी (सुट्टीचे दिवस वगळून) दुपारी ३.०० वा पर्यंत सीलबंद पाकिटात श्री बाणेश्वर शिक्षण संस्थेचे - कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बुऱ्हाणनगर (एकनाथनगर), ता.जि. अहिल्यानगर या पत्यावर स्वीकारण्यात येतील.

टीप : कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार संस्थेणे राखून ठेवलेले आहे.

सोबत : पुरवठादार/ ठेकेदार/दुकानदार यांचा संपर्क पत्ता व संपर्क क्रमांक

दिनांक : २६/०५/२०२५

अध्यक्ष
**श्री बाणेश्वर शिक्षण संस्था,**
बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर.

---

ब्रॅण्डेड व एक्सक्लुझिव्ह किचन शो-रूम करीता

## त्वरीत पाहिजेत

**3D डिझाईनर Female - (जागा १)**
Auto Cad / Sketchup / 3D Max इ. सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक, किमान १ ते २ वर्षाचा अनुभव आवश्यक. (जागा १)

**सेल्स एक्झिक्युटीव्ह - (जागा २)**
पद्वीधर / एमबीए, उत्तम संभाषण कौशल्य, किमान १ ते २ वर्षाचा अनुभव आवश्यक. (जागा १)

**हेल्पर - (जागा २)**
किचन ट्रॉली फिटींग करीता,अनुभव असल्यास प्राधान्य.

सर्व उमेद्वारांसाठी वयोमर्यादा : २० ते ३५
स्वहस्ताक्षरातील अर्जासह समक्ष भेटा वेळ - सकाळी ११ ते २ व सायं. ५ ते ७ (रविवार बंद)

ओस्तवाल किचन्स Har Ghar Ke Liye...
१, सिटी सेंटर कॉम्प्लेक्स, मिस्कीनमळा, तारकपूर-गंगा उद्यान रोड, सावेडी, अहमदनगर
GALAXY

## पुनर्विवाह वधू पाहिजेत

अपंग, लंगडी, मुकी, बहिरी, व्यंग, निराधार, पिडीत महिला आधार, जीवनाला कंटाळलेले, आधार नसलेले विधवा २२ ते ६० वय असलेले भेटा..

**9892911602**

---

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित

## आनंदऋषिजी हॉस्पिटल अॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर

### जनरल शस्त्रक्रिया शिबीर

शुक्रवार - दि. ३०-०५-२०२५ * वेळ : सकाळी १० ते २

जनरल सर्जन
डॉ. प्रविण मुनोत
डॉ. विवेक भापकर



सवलतीच्या दरात जनरल शस्त्रक्रिया शिबीर

अॅपेंडीक्स (Interval) रू. 10,000/-
इंगवायनल हार्निया रू. 10,000/- हायड्रोसिल रू. 4000/-

औषध खर्च वेगळा

**महावीर भवन** रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध. **भोजन रु. 35/- मात्र**

24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक

| | |
|---|---|
| डिजिटल एक्सरे रू. 250/- | सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह रू. 800/- |
| सिटीस्कॅन रू. 1250/- | एम.आर.आय. रू. 2500/- |

हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.

१२४, आनंद्ऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

---

## ९ वे पुण्यस्मरण



ना ध्यानी ना मनी
तुम्ही गेले आम्हास सोडुनी,
येते डोळ्यात निरंतर पाणी
उणीव तुमची भासे क्षणोक्षणी...

आपल्या पावन स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली..

**स्व. विठ्ठल बालय्या बुरा**
स्व. दि. २७/०५/२०१६

* दु:खांकित *

| | |
|---|---|
| चंद्रकांत विठ्ठल बुरा | पुरुषोत्तम विठ्ठल बुरा |
| राजेंद्र विठ्ठल बुरा | नारायण विठ्ठल बुरा |
| निलेश प्रकाश बुरा | राकेश चंद्रकांत बुरा |
| योगेश प्रकाश बुरा | पुष्कर पुरुषोत्तम बुरा |
| चि. अभिषेक राजेंद्र बुरा | चि. सुयश पुरुषोत्तम बुरा |

**समस्त बुरा परिवार..**

* फर्म *
श्री बालाजी डिजिटल्स । श्री लक्ष्मी इनोवेशन्स
अहिल्यानगर

---

कॅन्सर ला घाबरू नका, तज्ञ डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्या!

## MEDICAL & SURGICAL ONCOLOGY

— आता पूर्ण वेळ अहिल्यानगर मध्ये —

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी

**INDO IRISH HOSPITAL**

व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध...

Tapowan Road, A. Nagar | For Appointment 913042 3336 | 9860310001

---

## सुट्ट्या लागल्या



भाच्यांना, बहिणीला कपडे घ्यायचेत...?

बाबा सुट फ्रॉक पार्टीवेअर ड्रेस व बरेच काही

चला तर मग मयुरी मॉलला

१५-१६ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींसाठी
- सर्वांसाठी सर्व प्रकारचे कपडे
- असंख्य नवनवीन व्हरायटीज्
- होलसेल पेक्षाही कमी दरात

अहमदनगर जिल्ह्यातील प्रथम भव्य लेडीज मॉल **मयुरी लेडीज मॉल**
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूलजवळ, आगरकर मळा,अहिल्यानगर. 9028201188

---

घ.नं. 390/सदर बाजार/2025-26
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक- 22/05/2025

## जाहीर नोटीस

या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, भावना मोहन माखीजा, वय-60 वर्षे, धंदा - घरकाम, राहणार प्लॉट नं. 10, राधानगरी, नागरदेवळे, भिंगार, अहिल्यानगर यांनी घर नं. 390, सर्व्हे नं. 213/414, सदर बाजार, अहमदनगर छावनी परिषद हे (1) रजिस्टर खरेदीखत क्र. 2914/2017 दिनांक 29/06/2017 (2) रजिस्टर चुक-दुरुस्ती लेख क्र. 2804/2024 दिनांक 14/03/2024 च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 30 (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावणी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

घ.नं. 390, सदर बाजार
क्षेत्रफळ 417.00 चौ.फूट

कार्यालय अधिक्षक,
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

---

घ.नं. 390-C/सदर बाजार/2025-26
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक- 22/05/2025

## जाहीर नोटीस

या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, भावना मोहन माखीजा, वय-60 वर्षे, धंदा - घरकाम, राहणार प्लॉट नं. 10, राधानगरी, नागरदेवळे, भिंगार, अहिल्यानगर यांनी घर नं. 390-C, सर्व्हे नं. 213/411, सदर बाजार, अहमदनगर छावनी परिषद हे (1) रजिस्टर खरेदीखत क्र. 2914/2017 दिनांक 29/06/2017 (2) रजिस्टर चुक-दुरुस्ती लेख क्र. 2804/2024 दिनांक 14/03/2024 च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 30 (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावणी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

घ.नं. 390-C, सदर बाजार
क्षेत्रफळ 545.00 चौ.फूट

कार्यालय अधिक्षक,
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

---

घ.नं. 390-D/सदर बाजार/2025-26
छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर
दिनांक- 22/05/2025

## जाहीर नोटीस

या नोटीशीद्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. जितेश मोहन माखीजा, वय-34 वर्षे, धंदा - व्यापार, राहणार प्लॉट नं. 10, राधानगरी, नागरदेवळे, भिंगार, अहिल्यानगर यांनी घर नं. 390-D, सर्व्हे नं. 213/410, सदर बाजार, अहमदनगर छावनी परिषद हे (1) रजिस्टर खरेदीखत क्र. 2913/2017 दिनांक 29/06/2017 (2) रजिस्टर चुक-दुरुस्ती लेख क्र. 2805/2024 दिनांक 14/03/2024 च्या आधारावर आपले नावावर वर्ग/दाखल होणेसाठी या कार्यालयाकडे रीतसर अर्ज व कागदपत्र दाखल केले आहेत.

सदर बाबतीत ज्या कोणास कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षीस, खरेदी हक्क हितसंबंध असेल, वा अन्य कोणत्याही कारणामुळे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 30 (तीस) दिवसांचे आत सबळ कागदपत्रांचे पुराव्यासह मे. कार्यकारी अधिकारी, छावणी परिषद, अहमदनगर यांचेकडे तसे लेखी कळवावे.

सदर मुदतीनंतर आलेल्या हक्क/हरकतीवर विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

घ.नं. 390-D, सदर बाजार
क्षेत्रफळ 546.00 चौ.फूट

कार्यालय अधिक्षक,
कृते मुख्य अधिशासी अधिकारी,
अहमदनगर छावनी परिषद
(विक्रांत मोरे)

---

* दिनांक - 22 मे ते 29 मे 2025 | टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

| | |
|---|---|
| **Bhool Chuk Maaf** 08:00 AM I 10:25 AM I 12:45 PM I 03:15 PM I 05:45 PM I 08:05 PM I 10:30 PM | **Mission: Impossible** (Hindi) 10:10 AM I 10:40 PM; Eng.- 03:20 PM |
| **Final Destination Bloodlines** 08:00 AM I 06:25 PM | **ATA THAMBAYCHA NAAY** 11:30 AM |
| **RAID 2** 08:45 AM I 02:15 PM I 10:15 PM | **Lilo & Stitch** 11:30 AM |
| **April May 99** Marathi - 05:00 PM | **Gulkand** Marathi - 07:30 PM |

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow | CONNPLEX SMART THEATRE | AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

---

CONNPLEX CINEMAS

MANSOON DHAMAKA BLOCKBUSTER

TUESDAY TO THURSDAY

ANY MOVIE ANY SHOW ₹99 ₹149

GET READY TO EXPERIENCE ULTIMATE BIG SCREEN CELEBRATION WITH CONNPLEX CINEMAS

OFFER VALID ON 27 TO 29 MAY 2025* 3D 170/-*

FOR BOOKINGS VISIT MOVIETIME CINEMAS WEBSITE / APP

---

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater

— SHOW TIMINGS - 23 MAY to 29 MAY 2025 —

| | | |
|---|---|---|
| **भूल चूक माफ** 10:20 am \| 12:40 pm, 03:10 pm \| 05:40 pm, 08:15 pm \| 11:00 pm | **मिशन इम्पॉसिबल 8** 12:35 pm, 05:45 pm, 10:45 pm | **रेड 2** 09:40 am, 03:00 pm, 10:35 pm |
| **फायनल डेस्टिनेशन 5** 08:15 am, 08:45 pm | **लिलो & स्टिच** 10:25 am, 03:35 pm | **गुलकंद** 05:30 pm |

**आता थांबायचं नाय** 12:25 pm

टीप : शो च्या वेळा बदलू शकतात
Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow
नगर कॉलेज जवळ, जुडिओच्या वरती, अ. नगर
9881300400, 0241-2346000

Cinélife MINIPLEX

---

Dolby ATMOS | Cinélife MINIPLEX | DOLBY SURROUND 7.1

**WEDNESDAY CINEBLAST**

तिकिट दर ₹149

दर बुधवारी आपल्या सिनेलाईफ मध्ये

Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now book my show | 3 Screens 3X Entertainment

Near Nagar College, Above Zudio, A. Nagar.
9881300400, 0241-2346000